देशोन्नती
सोमवार, दि. २५ जानेवारी २०२१

# नेताजी सूभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन



शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली

**शिवाजी महाविद्यालय** गडचिरोली- येथे नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी करण्यात आली. या जयंती प्रित्यर्थ महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाद्वारे आभासी पद्धतीने (ऑनलाईन) पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे होते. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. आर. एस. कोल्हे तर आभारप्रा. एस. पी. डोमने यांनी मानले.

**मोहीनी हायस्कुल खेडेगांव-** येथे आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक दिगांबर हरडे होते. विशेष अतिथी म्हणुन समतादुतं

लोकमत
शनिवार, दि. १६ जानेवारी २०२१



# शिवाजी कॉलेजमध्ये घेतली पर्यावरणरक्षणाची शपथ

गडचिरोली : स्थानिक शिवाजी महाविद्यालयात रासेयो विभागातर्फे 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी पर्यावरणरक्षणाची शपथ घेतली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे होते. यावेळी प्रा.डॉ. जे.जी. उईके उपस्थित होते. उईके यांनी वायू, जल, अग्नी, पृथ्वी, आकाश आदी पंचतत्वांचे महत्त्व पटवून दिले. पंचतत्वाचे रक्षण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. यशस्वितेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

देशोन्नती, गुरुवार, दि. १४ जानेवारी २०२१

# शिवाजी महाविद्यालयात रक्तदान शिबीर

देशोन्नती वृत्तसंकलन...



**गडचिरोली** ● स्थानीक शिवाजी महाविद्यालयामध्ये शिवाजी महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष, राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत स्वामी विवेकानंद जयंती तसेच राजमाता जिजाऊ जयंती व युवा दिनानिमित्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बि.एस.चिकटे यांच्या मार्गदर्शनाखाली व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे.जी.उईके यांच्या नेतृत्वात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रासेयोच्या दहा स्वयंसेवकांनी रक्तदान केले. रक्तदात्यांमध्ये सुरज मोहुर्ले, नागेश गेडाम, अंकुश मेश्राम, दाणिश सय्यद, प्रज्वल उराडे, प्रफूल भांडेकर, पवन भोयर, अभय कूकडे, हर्षद वैरागडे, जतीन पूल्कवार यांचा समावेश आहे.

यावेळी ४५ रक्तदात्यांची यादी तयार करण्यात आली. भविष्यात गरजेनुसार या स्वयंसेवकांना रक्तदानासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात येईल अशी माहिती देण्यात आली. यावेळी जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्त संक्रमण विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोर ताराम, सतिश तडकलवार, विजय पत्तीवार, मुरलीधर पेद्दीवार, पियुश कांबळे, संदीप तुम्मरी, प्रतिक्षा काटेंगे आदि उपस्थित होते. रक्तदान शिबीराच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले. संचालन चंचल रोहनकर तर आभार सुरज मोहुर्ले यांनी मानले.

देशोन्नती, गुरुवार, दि. १४ जानेवारी २०२१

# शिवाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र व मराठी विषयाच्या संशोधन केंद्राला विद्यापीठाची मान्यता

**गडचिरोली** ● स्थानिक शिवाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र व मराठी विषयाला गोंडवाना विद्यापीठाची सत्र २०२०-२१ पासून आचार्य पदवीच्या संशोधन केंद्राला मान्यता मिळाली आहे. या महाविद्यालयात इतिहास व वाणिज्य विषयाला यापुर्वीच मान्यता मिळालेली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी संबंधित विषयाच्या संशोधन केंद्रात आचार्य पदवी करीता आपल्या नावाची नोंद करावी असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे यांनी केले आहे.

लोकमत
epaper.lokmat.com
बुधवार, दि. १३ जानेवारी २०२१

छायांकित जिल्हा

इव्हेंट सोशल



## १० युवकांनी केले रक्तदान

गडचिरोली : स्थानिक शिवाजी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्ष, युवा दिन व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिरात १० स्वयंसेवकांनी रक्तदान केले. रक्तदात्यांमध्ये सूरज मोहुर्ले, नागेश गेडाम, अंकुश मेश्राम, दानिश सय्यद, प्रज्वल उराडे, प्रफुल्ल भांडेकर, पवन भोयर, अभय कुकडे, हर्षद वैरागडे, जतीन पुल्कलवार यांचा समावेश आहे. जिल्हा रुग्णालयातील रक्ताची गरज लक्षात घेऊन पुन्हा ४५ जण रक्तदान करणार आहेत. रक्तदान शिबिर प्राचार्य डॉ.बी.एस.चिकटे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.जे.जी.उईके यांच्या नेतृत्वात घेण्यात आले. रक्त संक्रमण विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोर ताराम, सतीश तडकलावार, विजय पत्तीवार, मुरलीधर पेंदीवार, पीयूष कांबळे, संदीप तुमरी, प्रतीक्षा काटेंगे हे उपस्थित होते. चंचल रोहणकर, सूरज मोहुर्ले यांनी सहकार्य केले.

सकाळ
१३ जानेवारी २०२१

# शिवाजी महाविद्यालयात रक्तदानाने जयंती साजरी

गडचिरोली, ता. १२ : स्थानिक शिवाजी महाविद्यालय गडचिरोली येथे मंगळवार (ता.१२) शिवाजी महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती व युवादिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे. जी. उईके यांच्या नेतृत्वात रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या १० स्वयंसेवकांनी रक्तदान केले. रक्तदात्यांमध्ये सूरज मोहुर्ले, दानिश सय्यद, प्रज्वल उराडे, प्रफुल्ल भांडेकर, अंकुश मेश्राम, नागेश गेडाम, पवन भोयर, अभय कुकडे, हर्षद वैरागडे, जतिन पुल्लकवार, या स्वयंसेवकांनी रक्तदान केले.



गडचिरोली : रक्तदान करताना स्वयंसेवक व उपस्थित प्राध्यापक, कर्मचारी.

# सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

देशोन्नती

बुधवार, दि. ६ जानेवारी २०२१

देशोन्नती वृत्तसंकलन...

**गडचिरोली** ▪ आद्यशिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयामध्ये अभिवादन करण्यात आले. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते.

**शिवाजी महाविद्यालय गडचिरोली-** सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्य शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग, गडचिरोली व सर्च टीमच्या संयुक्त विद्यमाने तंबाखूमुक्ती व व्यसनमुक्तीवर जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ. बी.एस. चिकटे यांच्या मार्गदर्शनाखाली व रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.जे.जी. उइके यांच्या नेतृत्वात हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी २२ रा.से.यो. स्वयंसेवक व सर्चची टीम प्रामुख्याने उपस्थित होती. याप्रसंगी सर्च टीमचे प्रमुख मार्गदर्शक मोहन कुकुडकर, कुसुमताई गडपायले, प्रमोद कोटागले, हरिदास साखरे यांनी व्यसनमुक्तीवर सर्वे कसा करायचा या विषयावर रा.से.यो. स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. ५ जानेवारीला २४ गावांचा सर्वे करण्यात आला व तसेच ६ जानेवारीला गडचिरोली शहराच्या काही वार्डात सर्वे करण्यात येईल असे सांगण्यात आले. याप्रसंगी रा.से.यो. टीम लीडर सुरज योगाजी मोहुर्ले, चेतन कोलते, प्रज्वल उराडे, मोहित कुडावले, नेहा महाडोळे, नागेश गेडाम, ज्योत्सना सिडाम व इतर स्वयंसेवक उपस्थित होते.



शिवाजी महाविद्यालय गडचिरोली

देशोन्नती

बुधवार, दि. ५ फेब्रुवारी २०२०

**शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली-** शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली येथे महात्मा गांधी यांच्या ७२ व्या पुण्यतिथी निमित्य राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जे.जी. उइके, एस.पी. ढोमणे, प्रा. बावनकर, प्रा. कुतरमारे, प्रा. म्हशाखेत्री, प्रा. शेंडमाके, प्रा. उदापुरे, प्रा. दुमाणे, प्रा. कोसे, प्रा. बोदलकर, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली

सकाळ शनिवार, ९ जानेवारी २०२१

# शिवाजी महाविद्यालयाद्वारे दारू-तंबाखूचे सर्वेक्षण

गडचिरोली, ता. ८ : स्थानिक शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व व सर्च संस्थेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षीसुद्धा व्यसनमुक्तीवर सर्वेक्षण करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. बी.एस. चिकटे यांनी मार्गदर्शन केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे. जी. उइके यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना सर्वेक्षणाबद्दल माहिती दिली. सर्चचे कार्यकर्ते मोहन कुकुटकर, कुसुम गडपायले, प्रमोद कोटांगले व हरिदास साखरे यांनी व्यसनमुक्तीवर सर्वेक्षण कसे करायचे, याबर मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची सभा घेण्यात आली व त्यांना सर्वेक्षण कसे करायचे, याबद्दल प्रशिक्षण देण्यात आले. २४ गावांचे सर्वेक्षण करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक चंचल रोहणकर, नेहा महाडोळे, यज्ञिका बोकडे, ज्योत्स्ना सिडाम, पल्लवी भोयर, विक्की पोहरकर उपस्थित होते.



गडचिरोली : सर्वेक्षण करताना महाविद्यालयाची चमू.

देशोन्नती शुक्रवार, दि. ८ जानेवारी २०२१

# शिवाजी महाविद्यालय, सर्चच्या संयुक्त विद्यमाने सर्वेक्षण



देशोन्नती वृत्तसंकलन...

गडचिरोली ▪ स्थानीक शिवाजी महाविद्यालयातील रासेयो विभाग व चातगांव येथील सर्च टीमच्या संयुक्त विद्यमाने दारू, तंबाखु सेवन व खर्च यावर सर्वे करण्यात आला.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. बी.एस.चिकटे यांनी मार्गदर्शन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.जे.जी. उईके यांनी रा.से.यो. स्वंयसेवकांच्या सर्वे बद्दल माहिती दिली. त्यानंतर सर्च टीमचे प्रमुख वक्ते व कार्यकर्ते मोहन कुकुडकर, कुसुमताई गडपायले, प्रमोद कोटांगले व हरिदास साखरे यांनी व्यसनमुक्तीवर सर्वे कसा करायचा याबाबत मार्गदर्शन केले. ४ जानेवारी २०२१ ला रा.से.यो. स्वयंसेवकांची सभा घेण्यात आली व त्यांना सर्वे कसा करायचे याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. ०५ जानेवारी २०२१ ला २४ गावांचा व्यसनमुक्तीवर सर्वे करण्यात आला. एका विद्यार्थ्यास १ किंवा २ गांव देण्यात आले. या उपक्रमात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.जे.जी.उईके व सर्च टीमच्या निगरानीखाली हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. ६ जानेवारी २०२१ ला गडचिरोली शहरात सुद्धा अनेक वार्डात सर्वेक्षण करण्यात आले. या उपक्रमात गावातील व शहरातील सभ्य नागरीकांचा सहभाग लाभला.

याप्रसंगी रासेयो स्वयंसेवक चंचल रोहणकर, नेहा महाडोळे, यज्ञिका बोकडे, ज्योत्सना सिडाम, पल्लवी भोयर, विक्की पोहरकर, प्रज्वल उराडे, रोहीत कुडावले, पुनम गौतम, अश्विनी गेडाम, अश्विनी डवले, अक्षय चलाख आदि प्रामुख्याने उपस्थित होते.

# म. गांधी, लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन

देशोन्नती
शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२०



शिवाजी महाविद्यालय गडचिरोली

**शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली :** येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभागाद्वारे म. गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्त महाविद्यालय परीसरात स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम राबविली. सर्वप्रथम प्राचार्य डॉ. बि.एस. चिकटे यांनी महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील काही स्वयसेवकांनी मास्क व सॅनिटायझर लावून महाविद्यालयातील क्लासरूम, वाचनालय, जिमखाना परिसर झाडुन स्वच्छ केला. या कार्यक्रम प्रसंगी प्रा. जे.जी. उईके, प्रा. एस. पि. ढोमणे, प्रा. आर.एस. कोल्हे, प्रा. डॉ. कैलास माडारकर, डॉ. विलास खुणे, प्रा. डॉ. राजेंद्र गोरे, प्रा. डॉ. मेश्राम, प्रा. संजय राऊत, प्रा. डॉ. नक्षिणे तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**श्रीराम विद्यालय कुरखेडा :** येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पी.डब्ल्यू मरणे होते. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन एन.एस. माकडे तर आभार एल.डब्ल्यू. बडवाईक यांनी मानले.

---

**शिवाजी महाविद्यालय गडचिरोली :** येथे म. गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविण्यात आला. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. एस. चिकटे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. याप्रसंगी रासेयो



कार्यक्रम अधिकारी मा. प्रा डॉ. जे. जी. उईके, प्रा .एस. पी. ढोमने, रासेयो स्वयंसेवक प्रमुख सूरज योगाजी मोहुर्ले, उपप्रमुख चेतन कोलते व स्वयंसेवक नेहा महाडोळे, अश्विनी गेडाम, संकित गेडाम, भूषण गेडाम, सीमा पडोटी आदी उपस्थित होते. तसेच कोरोना विषाणूचा संसर्ग होऊ नये यासाठी सॅनिटाइझर व मास्कचा वापर करून नियमांचे पालन केले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी म. गांधी व लालबहादुर शास्त्री जयंती व स्वच्छता अभियानाबाबत माहिती व तसेच रासेयोमार्फत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमाची माहिती यावेळी देण्यात आली.



पुण्यनगरी
शनिवार, ३ ऑक्टोबर २०२०

लोकमत सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२०

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती

# शिक्षक दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

गडचिरोली : देशाचे पहिले उपराष्ट्रपती व दुसरे राष्ट्रपती, शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून ५ सप्टेंबरला जिल्ह्यात ठिकठिकाणी साजरी करण्यात आली. या निमित्ताने शाळा महाविद्यालयांत विविध कार्यक्रम पार पडले. पहिल्यांदाच विद्यार्थ्यांविना शिक्षक दिन कार्यक्रम पार पडला.



शिवाजी महाविद्यालय गडचिरोली येथे माल्यार्पण करताना प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे.

शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली - येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे होते. यावेळी प्रा. डॉ. पी. डी. घोरपडे यांनी शिक्षकांचे जीवनातील योगदान मनोगतातून व्यक्त केले. प्रा. डॉ. व्ही. आर. खुणे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर विचार व्यक्त केले. डॉ. चिकटे यांनी जीवनात गुरुशिवाय यश, कीर्ती, पैसा प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे गुरुचा आदर्श बाळगावा व सद्गुण आत्मसात करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. आर. एस. कोल्हे तर आभार प्रा. एस. पी. ढोमणे यांनी मानले.

पुण्य नगरी बुधवार, ५ फेब्रुवारी २०२०

# शिवाजी महाविद्यालयात युवा महोत्सवाचे उद्घाटन



गडचिरोली : येथील शिवाजी महाविद्यालयात मंगळवारी (४ फेब्रुवारी) युवा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन कुलगुरू डॉ. एन. व्ही. कल्याणकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव देवराव पाटील म्हशाखेत्री तर प्रमुख अतिथी म्हणून शरद पाटील ब्राम्हणवाडे, प्रा. भगवान पाटील मुनघाटे, डी. एन. चापले, प्रा. डॉ. पी. डी. घोरपडे, प्रा. डॉ. आर. एस. गोरे, प्रा. आर. एस. कोल्हे, प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे आदी उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. एन. व्ही. कल्याणकर म्हणाले की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी असे कार्यक्रम महाविद्यालयाने राबविले पाहिजे. महाविद्यालयाव्यतिरिक्त इतत्र सुद्धा असे व्यासपीठ विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावे, यासाठी अविष्कार इंद्रधनुष्य, आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करीत असतो. विद्यार्थ्यांनी याचा उपयोग करून स्वतःचा सर्वांगीण विकास करावा, असा सल्ला त्यांनी दिला. याप्रसंगी देवराव पाटील म्हशाखेत्री यांनी सांगितले की, विद्यार्थी जीवनात वेळेला खूप महत्त्व असते. या वेळेचा सदुपयोग करूनच तुम्हाला व्यक्तिगत विकास साधायचा असतो. त्यामुळेच वेळेचे नियोजन करुनच तुम्ही यशस्वी होऊ शकता. मिळालेल्या संधीचे सोने करा, असे ते म्हणाले. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही मार्गदर्शन केले. संचालन प्रा. आर. बी. शेडमाके तर आभार प्रा. ढोमणे यांनी मानले.

लोकमत www.lokmat.com दि. ५ फेब्रुवारी २०२०

# प्रबळ इच्छाशक्ती व प्रयत्नानेच मिळते यश

## युवा महोत्सव : मुख्याधिकाऱ्यांचे प्रतिपादन



मार्गदर्शन करताना मुख्याधिकारी सतीश चौधरी, उपस्थित अनिल म्हशाखेत्री.

लोकमत न्यूज नेटवर्क

चामोर्शी : प्रबळ इच्छाशक्ती व प्रयत्नातील सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या दोन्ही गोष्टी जवळ बाळगून जीवनात तशी वाटचाल करावी, असे प्रतिपादन चामोर्शी नगर पंचायतीचे मुख्याधिकारी सतीश चौधरी यांनी केले.

शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गडचिरोलीद्वारा संचालित येथील दादासाहेब देवतळे महाविद्यालयात युवा महोत्सव घेण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिल म्हशाखेत्री होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष के. के. भोयर, नगर पंचायतीचे उपअभियंता निखिल कारेकर, प्राचार्य डॉ. डी. जी. म्हशाखेत्री आदी उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय म्हस्के, संचालन प्रा. दीपिका हट्वार यांनी केले तर आभार प्रा. वंदना धुटे यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

लोकमत बुधवार, दि. ५ फेब्रुवारी २०२०

## कुलगुरूंचे प्रतिपादन : गडचिरोलीत युवा महोत्सवाचे उद्घाटन

# व्यक्तिमत्वाचा विकास करा

लोकमत न्यूज नेटवर्क

गडचिरोली : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्यांचे सुप्त कलागुण विकसित करण्यासाठी महाविद्यालय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध होते. याशिवाय इतरत्र व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी विद्यापीठ अविष्कार, इंद्रधनुष्य, आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा आदींचे आयोजन करीत असते. या व्यासपीठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा, असे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एन. व्ही. कल्याणकर यांनी केले.



मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ. एन. व्ही. कल्याणकर, मंचावर उपस्थित शिवाजी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी.

शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गडचिरोलीद्वारा संचालित येथील शिवाजी महाविद्यालयाच्या युवा महोत्सवाचे उद्घाटन मंगळवारी पार पडले. यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव देवराव म्हशाखेत्री होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सदस्य शरद ब्राम्हणवाडे, प्रा. भगवान मुनघाटे, डी. एन. चापले, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. पी. डी. घोरपडे, प्रा. डॉ. आर. एस. गोरे, प्रा. आर. एस. कोल्हे, प्राचार्य डॉ. बी. एच. चिकटे उपस्थित होते.

उद्घाटन सोहळा आटोपल्यानंतर रांगोळी, पुष्प सजावट व डिश डेकोरेशन स्पर्धा घेण्यात आली. सायंकाळच्या सुमारास सांस्कृतिक कार्यक्रम झाले. बुधवारी 'सुधारित नागरिकत्व कायदा- योग्य की अयोग्य' या विषयावर सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

संचालन प्रा. आर. व्ही. शेडमाके यांनी केले तर आभार. प्रा. एस. पी. डुमणे यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व वरिष्ठ व कनिष्ठ प्राध्यापक, एमसीव्हीसी विभागाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

देशोन्नती बुधवार, दि.५ फेब्रुवारी २०२०

# विद्यार्थ्यांनी सर्वांगिण विकास साधावा

**गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कल्याणकर यांचे प्रतिपादन, शिवाजी महाविद्यालयात युवा महोत्सव**

गडचिरोली □ प्रतिनिधी

महाविद्यायीन स्तरावर शिक्षण घेत असतांना मिळालेल्या व्यासपीठाचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांनी आपला सर्वांगिण विकास साधावा असे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नामदेव कल्याणकर यांनी केले.

स्थानिक शिवाजी महाविद्यालयात आज ४ फेब्रुवारी रोजी युवा महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी ते उद्‌घाटक म्हणुन बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव देवराव पा. म्हशाखेत्री होते.



तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सदस्य शरद पाटील ब्राम्हणवाडे, सदस्य भगवान पाटील मुनघाटे,सदस्य डी.एन. पाटील चापले, कार्यक्रमाचे आयोजक तथा प्राचार्य डॉ.बि.एस. चिकटे,वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. पी.टी. धोरपडे,क्रिडा विभागप्रमुख प्रा. डॉ. आर.एस. गोरे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. आर.एस. कोल्हे उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. कल्याणकर पुढे म्हणाले, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सुप्त, कला गुणांना वाव मिळावा, त्यांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी असे कार्यक्रम महाविद्यालयाने राबविले पाहिजे. महाविद्यालया व्यतीरीक्त इतरत्र सुध्दा असे व्यासपीठ विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावे. यासाठी मी अविष्कार, इंद्रधनुष्य,महाविद्यालयीन स्पर्धा इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करीत असतो. विद्यार्थ्यांनी याचा उपयोग करून स्वतःचा सर्वांगिण विकास साधावा असेही ते म्हणाले.

यावेळी प्रास्ताविकपर भाषणातून प्राचार्य डॉ. बी.एस. चिकटे यांनी या युवा-महोत्सवाच्या दोन दिवसीय कार्यक्रमात कोणकोणत्या स्पर्धा आयोजित केलेल्या आहेत याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आपल्यामधील सुप्त कला गुण दाखविण्यासाठी या व्यासपीठाचा उपयोग करावा असे आवाहन केले. तसेच व्यासपिठावर उपस्थित असलेले प्रमुख अतिथी शरद पाटील ब्राम्हणवाडे, प्रा. भगवान पाटील मुनघाटे, डी.एन. पाटील चापले यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संचालन प्रा. आर.बी. शेडमाके, तर आभार प्रा. एस.पी. डोमणे यांनी मानले. या कार्यक्रमाला सर्व वरिष्ठ प्राध्यापकवृंद, कनिष्ठ प्राध्यापकवृंद, एम.सी.व्ही.सी. प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, अशकालीन प्राध्यापकवृंद तसेच विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन करावे-देवराव पा. म्हशाखेत्री**

अध्यक्षीय भाषणातून मार्गदर्शन करतांना संस्थेचे सचिव देवराव पाटील म्हशाखेत्री यांनी विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन करावे असे आवाहन केले. विद्यार्थी जीवनात वेळेला खूप महत्त्व असते. या वेळेचा सदुपयोग करूनच तुम्हाला व्यक्तिमत्त्व विकास साधायचा आहे. त्यामुळेच वेळेचे नियोजन करूनच तुम्ही यशस्वी होऊ शकता. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीच सोने करावे असेही आवाहन देवराव पा. म्हशाखेत्री यांनी केले.

सकाळ नागपूर, रविवार, १२ जुलै २०२०

## जेप्रा गाव परिसरात कोरोना जनजागृती

गडचिरोली, ता.११ : स्थानिक शिवाजी महाविद्यालय, गडचिरोलीअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत प्राचार्य डॉ. बी. एस चिकटे यांच्या मार्गदर्शनात जेप्रा येथे कोरोनाबद्दल जनजागृती करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे. जी. उइके यांनी दत्तक ग्राम जेप्रा (राजगाटा माल) व दिभना येथे कोविड-१९ वर जनजागृती कार्यक्रम घेतला. तसेच गरजू लोकांना फेस मास्क व अन्नधान्य वाटप करण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सूरज मोहूर्ले, पूजा मेश्राम, ललित जेंगठे, संदीप निकुरे, जितेंद्र चुधरी, युगल मोगरकर व तनुजा संदोकर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला ग्रामपंचायत जेप्राचे उपसरपंच गुणाजी देशमुख व टिकाराम गावतुरे उपस्थित होते.

लोकमत शनिवार, दि. १८ जुलै २०२०



## शिवाजी कला महाविद्यालयाचा उज्ज्वल निकाल

गडचिरोली : स्थानिक धानोरा मार्गावरील शिवाजी महाविद्यालयातील कला शाखेचा इयत्ता बारावीचा निकाल ७२.९३ टक्के लागला. हर्षल वैरागडे हिने ७५.३८, शिवभूषण भेंडारे याने ७४.00, रितीक म्हशाखेत्री याने ७१.५३ टक्के गुण मिळविले. एमसीव्हीसी विभागाचा निकाल ९९.३६ टक्के लागला असून या विभागात सावित्री मांदाळे हिने ७६.30 टक्के गुण घेऊन प्रथम तुषार डोईजड ७४.४६ तर चेतन तोडासे याने ७४.६१ टक्के गुण मिळविले. यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अनिल म्हशाखेत्री, सचिव डी. एम. म्हशाखेत्री, प्राचार्य भूपेश चिकटे यांनी कौतुक केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी एमसीव्हीसी विभागाचे प्रा. मुनींद्र म्हशाखेत्री उपस्थित होते.

देशोन्नती

गडचिरोली | ५

बुधवार, दि. ८ जुलै २०२०

## शिवाजी महाविद्यालयातर्फे जेप्रा येथे कोरोनावर जनजागृती



**गडचिरोली-** स्थानिक शिवाजी महाविद्यालयाअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत प्राचार्य डॉ.बी.एस.चिकटे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.जे.जी.उइके यांच्यानेतृत्वात दत्तक ग्राम जेप्रा व दिमना येथे कोरोनावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच फेस मॉस्क व अन्नधान्य गरजू लोकांना वाटप करण्यात आले.

या प्रसंगी रा.से.यो. स्वयंसेवक सुरज मोहुर्ले, पुजा मेश्राम, ललीत जेंगठे, संदीप चिकुरे, जितेंद्र चुधरी, मुगल मोगरकर व तनुजा संदोकर यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमास जेप्राच्या उपसरपंचा मृणाली देशमुख व टिकाराम गावतुरे उपस्थित होते.

देशोन्नती

गडचिरोली

बुधवार, दि. १५ जुलै २०२०

## शिवाजी महाविद्यालयातर्फे जेप्रा येथे कोरोना जनजागृती कार्यक्रम

**गडचिरोली** - स्थानिक शिवाजी महाविद्यालया अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत प्राचार्य डॉ.बी.एस चिकटे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.जे.जी.उइके यांनी दत्तक ग्राम जेप्रा व दिभना येथे जनजागृती कार्यक्रम आयोजित केला तसेच गरजु नागरीकांना फेस मास्क व अन्नधान्य वाटप केले.



या प्रसंगी ग्रामपंचायत जेप्राचे उपसरपंच गुणाजी देशमुख व टिकाराम गावतुरे हजर होते. यशस्वीतेसाठी रासेयोचे स्वयंसेवक सूरज मोहुर्ले, पूजा मेश्राम, ललीत जेंगठे, संदीप चिकुरे, जितेंद्र चुधरी, मुगल मोगरकर, तनुजा संदोकर यांनी सहाकर्य केले.

21 Feb, 20

देशोन्नती 21 Feb. 2020

# शिवाजी महाविद्यालयात शिवाजी महाराज जयंती

**गडचिरोली** ▫ प्रतिनिधी



स्थानिक शिवाजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी.एस.चिकटे होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी व वक्ते म्हणून प्रा. डॉ. के.आर. मांडारकर, प्रा. डॉ. एम.जे. मेश्राम, प्रा. एम.पी. म्हशाखेत्री, प्रा. डॉ. आर.एस. गोरे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना प्रा. डॉ. के.आर. मांडारकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. तसेच प्रा. डॉ. एम.जे. मेश्राम, प्रा. डॉ. आर.एस. गोरे व प्रा. एम.पी. म्हशाखेत्री यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. बि.एस. चिकटे यांनी, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर लहानपणापासूनच चांगले संस्कार झाले. त्यामुळेच ते गोर-गरीबांचे राजे व छत्रपती बनले. आपण सुध्दा अशा थोर-पुरूषांची आत्मचरित्रे वाचून कर्तत्वावान बनावे असे सांगितले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. एस.पी. ढोमणे तर आभार प्रा. आर.एस. कोल्हे यांनी मानले. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

31 Dec. 19

# नव्या वर्षाचे स्वागत शुध्दीत राहून करा

## ■ डॉ. अभय बंग यांचे आवाहन ■ मुक्तीपथच्या वतीने जनजागृती कार्यक्रम

**गडचिरोली** ▫ प्रतिनिधी



दारू पिल्याने आनंद मिळतो हा सर्वात मोठा गैरसमज आजच्या युवा पिढीमध्ये प्रचलित आहे. आणि मग आनंद मिळण्यासाठी तरुण पिढी दारुकडे वळते. त्यांचे आवडते फिल्मस्टार देखील त्यांना चित्रपटांमध्ये दारू पितांना दिसतात. पण आज आनंद देणारा पहिला प्याला पुढे दुःखाची लाट घेऊन येतो. कारण दारूचा पहिला प्यालाच व्यसन लावतो आणि एकदा व्यसन लागले की माणूस दारुला नाही तर दारूच माणसाला पिते. त्यामुळे दारूच्या पहिल्या थेंबालाच नाही म्हणा आणि नवीन वर्षाचे स्वागत शुद्धीत राहून करा असे आवाहन मुक्तिपथ अभियानाचे संस्थापक डॉ. अभय बंग यांनी केले.

नवीन वर्षाची सुरुवात दारूच्या नशेत झिंगून करण्याची विकृत संस्कृती या काही वर्षात सुरू झाली आहे. पण नशेत बेभान होऊन नवीन वर्षाचे स्वागत करण्यात कुठलाच शहाणपणा नाही. त्यामुळे युवा वर्गासह सर्वांनीच नवीन वर्षाचे स्वागत शुद्धीत राहून करावे यासाठी गडचिरोली जिल्ह्यात मुक्तिपथ अभियान, जिल्हा पोलीस प्रशासन आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी संयुक्तपणे '३१ डिसेंबर दारूला नाही म्हणा, नवीन वर्षाचे स्वागत शुद्धीत राहून करा' हा उपक्रम मंगळवारी ३१ डिसेंबर रोजी हाती घेत गडचिरोली शहरासह सर्वच तालुक्यात रॅली आणि पथनाट्याच्या माध्यमातून घेण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. अभय बंग यांनी युवांना मार्गदर्शन केले. शहरातील विविध महाविद्यालतील युवक युवती, प्राध्यापक वृंद सोबतच कुलगुरू डॉ. नामदेव कल्याणकर, डॉ. अभय बंग, जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे, मुक्तिपथ संचालक डॉ. मयूर गुप्ता, उपसंचालक संतोष सावळकर, विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख नरेश मडावी या रॅलीत सहभागी झाले होते. कुलगुरू डॉ. कल्याणकर यांनी युवांना यावेळी संबोधित केले. शहरातील प्रमुख मार्गाने ही रॅली शिवाजी महाविद्यालयात पोहोचली. विविध महाविद्यालयांमधील हजारो विद्यार्थी व्यसन विरोधी घोषणा देणारे फलक घेऊन रॅलीत सहभागी झाले होते. शासकीय विज्ञान महाविद्यालय, शिवाजी महाविद्यालय, इंदिरा गांधी महाविद्यालय आणि महिला महाविद्यालय आणि के. डी. बी. पी महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी दारूने पिल्याने होणारे नुकसान सांगणारी पथनाट्ये सादर केली.

यामध्ये शासकीय विज्ञान महाविद्यालयाने प्रथम तर शिवाजी महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे जिल्हा पोलीस प्रशासनही या रॅलीत व शिवाजी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात सहभागी झाले होते. जिल्ह्यातील ११ तालुक्यात जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

24/01/20

देशोन्नती 24 Jan. 2020

# रासेयो स्वयंसेवकांनी बांधला कठाणी नदीवर बंधारा

**गडचिरोली ▫ प्रतिनिधी**



स्थानीक शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे जेप्रा येथे सुरु असलेल्या विशेष रासेयो शिबीराअंतर्गत राजगाटा माल या गावाजवळ कठाणी नदीवर वनराई बंधारा बांधण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बि.एस. चिकटे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे.जी. उईके, प्रा. एस.पी. ढोमणे, किसान विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मुकूंदा म्हशाखेत्री, जेप्राचे सरपंच गुणवंत जंबेवार, उपसरपंच गुणाजी देशमुख, पंचायत समिती सदस्य नेताजी गावतुरे, ग्रामसेवक डी.एम. ठाकरे, जि.प. प्राथमिक शाळा यांच्या नेतृत्वात संपुर्ण राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक, विद्यार्थी, विद्यार्थीनींनी एकत्रीत काम करून नदीवर बंधारा बांधला. यामध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच जेप्रा व राजगाटा माल येथील समस्त प्रतिष्ठीत नागरीकांचे सहकार्य लाभले.

08/01/20

देशोन्नती 8 Jan. 2020

**मोहिम** | शिवाजी महाविद्यालय व मुक्तीपथ चमुचा सहभाग

# रॅली काढून पोलिसांची पानठेलाधारकांवर कारवाई



**चामोर्शी ▫ तालुका प्रतिनिधी**

शहरातील पानठेलाधारकांनी खर्रा व इतरही तंबाखूजन्य पदार्थांची विक्री बंद करण्यासाठी स्थानिक पोलिसांनी काल ७ जानेवारी रोजी शहरात जनजागृती रॅली काढली. दरम्यान १५ ते २० पानठेल्यांची तपासणी करून तंबाखूजन्य पदार्थ जप्त करून कोटपा कायद्यांतर्गत दंड ठोठावला. यावेळी आयोजित रॅलीत शिवाजी विद्यालयाचे विद्यार्थी आणि मुक्तिपथ तालुका चमू सहभागी झाले होते.

चामोर्शी शहरात पानठेलाधारकांची संख्या बरीच असून मोठ्या प्रमाणात खर्रा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होते. याचा विपरीत परिणाम लोकांच्या आरोग्यावर होतो. त्यामुळे अशा पदार्थांची पानठेलाधारकांनी विक्री बंद करावी यासाठी चामोर्शी पोलिसांनी पोलीस निरीक्षक जितेंद्र बोरकर यांच्या मार्गदर्शनात शिवाजी महाविद्यालयाच्या सहकार्याने जनजागृती रॅली काढली. जनजागृतीचे फलक घेऊन मोठ्या संख्येने विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

शिवाजी महाविद्यालय ते हतीचौक रोड या मार्गावर रॅली काढताना पोलिसांनी १५ ते २० पानठेल्यांवर धाडी टाकून खर्रा विक्रीचे साहित्य व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करून कोटपा कायद्यांतर्गत त्यांच्यावर दंड ठोठावला. या पदार्थांची चौकात होळी करण्यात आली. मुक्तिपथ संघटक आनंद इंगळे आणि उपसंघटक रूपेश अंबादे यांनी सर्वांना व्यसनमुक्तीचा संकल्प दिला. सातत्याने अशी रॅली शहरात सर्वत्र काढून खर्राविक्रेत्यांवर पायबंद घालावा अशी मागणी केली जात आहे. पोलिसांच्या या कृतीमुळे खर्रा विक्रेत्यांचे धाबे चांगलेच दणाणले.

## धानोरा नगरपंचायतीने जप्त केला १५ - २० किलो प्लॉस्टीक

**धानोरा ▫ तालुका प्रतिनिधी**

शासनाने सर्वत्र प्लॉस्टिकच्या वापरावर बंदी घातली असतानाही सर्रास प्लॉस्टिकचा वापर सुरू असल्यामुळ धानोरा नगर पंचायतीच्या स्वछता विभागाकडून जप्तीची मोहीम राबवून धानोरा शहरातील व्यापारी वर्गाकडून अंदाजे १५ ते २० किलो सिंगल युज प्लास्टिक जप्त करण्यात आले.

सिंगल युज प्लॉस्टिकच्या वापरासाठी प्रथम वेळी ५००० रु. ,दुसऱ्या वेळी १० हजार रु. व तिसऱ्या वेळी २५हजार रुपये दंड आकारण्यात येणार असल्याचा ईशारा देण्यात आला. तिनदा दंड आकारल्यानंतरही प्लॉस्टीकचा वापर करतांना आढळून आल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल अशी तंबी मुख्याधिकारी सचिन राऊत यांनी दिली. त्यामुळे नगर पंचायत धानोरा क्षेत्रात यापुढे कोणीही नागरिक व व्यावसायिक यांनी सिंगल युज प्लॉस्टिकचा वापर करू नये व शहराचे आरोग्य अबाधित राखावे असेही आवाहन मुख्याधिकारी राऊत यांनी केले.

25 Feb, 20

देशोन्नती 25. Feb, 2020

# शिवाजी महाविद्यालयात सर्वेक्षण

**गडचिरोली ▫ प्रतिनिधी**




स्थानिक शिवाजी महाविद्यालयांतर्गत समाजशास्त्र विभागाच्या अनुषंगाने तालुक्यातील नवेगाव येथील ग्रामवासीय कुटूंबाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक सर्वेक्षण करण्यात आले. कुटूंब प्रमुखांच्या मुलाखती घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एस. चिकटे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी रासेयो प्रमुख प्रा. जे.जी. उइके, प्रा. एस.पी. ढोमणे, रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. पी.टी. सहारे यांनी केले तर आभार प्रा.ए. डब्ल्यू. वसाके यांनी मानले.

9 Feb, 2020

गडचिरोली | ३

रविवार, दि. ९ फेब्रुवारी २०२०

# शिवाजी महाविद्यालयात माजी विद्यार्थी व पालक मेळावा

■ माजी विद्यार्थ्यांनी दिला आठवणींना उजाळा



**गडचिरोली ▫ प्रतिनिधी**

स्थानिक शिवाजी महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भुपेश चिकटे यांच्या अध्यक्षतेखाली माजी विद्यार्थी व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा सांख्यीकी अधिकारी रमेश पेरगु , पोर्ला येथील शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य जगदीश म्हस्के उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे म्हणाले, माजी विद्यार्थी व महाविद्यालय यांचे ऋणानूबंध कायम असावे. विद्यार्थ्यांनी केलेली प्रगती ही महाविद्यालयाची जमेची बाजू आहे असेही ते म्हणाले. जिल्हा सांख्यीकी अधिकारी रमेश पेरगू म्हणाले की, मी सुध्दा या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असून मी आज जे आहे ते या महाविद्यालयाची देण आहे. मी कधीही शिवाजी महाविद्यालयाला विसरू शकणार नाही असेही ते म्हणाले. प्रमुख अतिथी जगदिश म्हस्के यांनी सुध्दा अनेक गमतीदार गोष्टी सांगून मार्गदर्शन केले. तसेच माजी विद्यार्थी सचिन ठाकूर, भागेश टेंभूर्णे यांनी सुध्दा मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. विलास खुणे तर आभार डॉ. एम.टी. नक्षीणे यांनी मानले. कार्यक्रमाला बहुसंख्य माजी विद्यार्थी उपस्थित होते.

8 March, 2020

गडचिरोली शहर

गडचिरोली
सोमवार, दि. ९ मार्च २०२०

# पवित्र सेमाना देवस्थान परिसरात दारुच्या बॉटल्स, प्लास्टीकचा कचरा, पत्रावळी, उरलेले अन्न टाकुन देवाला नवस पावणार काय?




अनिल धामोडे





पवित्र सेमाना देवस्थानचे पावित्र्य राखणे हे आपले सर्वांचेच कर्तव्य असून नैसर्गिक सौंदर्याने नटलेला हा परिसर घाणीचा विळख्यात सापडला आहे. भक्तीभावाने येणारे भाविकच याठीकाणी भोजनावळी आयोजित करून उरलेले अन्न, प्लॉस्टीकचा कचरा, पत्रावळी, द्रोण, एवढेच नव्हे तर चक्क दारुच्या बॉटल्या टाकुन देवस्थानाची विटंबना करीत आहेत. प्रचंड घाणीच्या विळख्यात सापडलेला हा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याची सर्वांचीच जबाबदारी आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून होळीच्या पर्वावर आधारविश्व फाऊंडेशन, व्ही.के.पी. पुरुष बचत गट व सायकलिंग ग्रुप च्या वतीने सेमाना देवस्थान परिसरात संपूर्ण स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचा संदेश दिला. एवढेच नव्हे तर झाडांची कत्तल करून मौल्यवान लाकूडफाट्यांची होळी करण्यापेक्षा आपापल्या परिसरातील कचरा साफ करून त्याची पर्यावरणपुरक होळी करण्याचा संदेश देखील दिला. नैसर्गिक सौंदर्याने नटलेला हा परिसर नेहमी स्वच्छ, सुंदर राहून प्रसिध्द देवस्थानाचे पावित्र्य जोपासावे याच उद्देशाने स्वच्छता अभियानानंतर दै. देशोन्नतीच्या वतीने 'थेट चर्चा' चे आयोजन करण्यात आले होते. देवस्थान परिसरात येणारे भाविक, भंडाऱ्याचे आयोजक, न.प. प्रशासन, प्लॉस्टिकच्या साहित्याची खुलेआम विक्री करणारे दुकानदार यांनी आपआपली जबाबदारी ओळखून कार्य केल्यास या पवित्र देवस्थानाची विटंबना थांबेल, असा सुर थेट चर्चेतून व्यक्त झाला.

8 March 2020

स्वच्छता ही निरंतर चालणारी प्रक्रीया आहे, मात्र ज्याप्रमाणे आपले श्रध्देचे ठिकाण असलेलं देवस्थान परिसर स्वच्छ ठेवणे आपली जबाबदारी नाही काय? या परिसरात दारूच्या बॉटल्स, उरलेले अन्न, वेगवेगळा कचरा टाकून खरेच आपण केलेले नवस देवाला पावेल काय याचा सारासार विचार तरी नागरीकांनी करावा. हा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवावा एवढीच अपेक्षा.

**प्रा. सुनिता साळवे, सचिव, आधार विश्व फाऊंडेशन**

सार्वजनिक ठिकाणांचे सुरू असलेले विद्रुपीकरण, विटंबना हे आता कुठेतरी थांबवायला पाहिजे. स्वच्छतेबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत असली तरी नागरीकांकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचेच दिसून पडत आहे. निदान स्वतःच्या आरोग्यासाठी तरी हे दुष्टचक्र कुठेतरी थांबवायला पाहिजे. प्रत्येकाने स्वच्छतेबाबत जाणीव ठेवल्यास सर्वच सार्वजनिक ठिकाणावर स्वच्छता राखण्यास मदत होईल. नगर पालिका प्रशासनाने देखील सेमाना देवस्थानाच्या स्वच्छतेकडे लक्ष देणे गरजेचे वाटते.

**प्रा. एम. व्ही. उरकुडे**

आधार विश्व फाऊंडेशन तर्फे नेहमी प्रमाणेच यावेळी देखील सेमाना परिसरात स्वच्छता अभियान राबवून कचऱ्याची होळी करण्यात आली. आपआपल्या परिसरातील कचरा गोळा करून पर्यावरणपुरक होळी केल्यास स्वच्छता देखील राखता येईल व नैसर्गिक संपत्तीची हाणी देखील होणार नाही. या परिसरात टाकल्या जाणारी घाण व त्यामुळे पसरलेली दुर्गंधी पाहून मन खिन्न झाले. सुजाण नागरिकांनी, भाविकांनी या परिसराचे पावित्र्य जपावे एवढीच कळकळीची विनंती या भेट चर्चेच्या माध्यमातून करावशी वाटते.

**स्नेहा सुधिर आखाडे (हमके)**



सेमाना देवस्थान परिसरात अशा प्रकारे सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले असते. जेवणावळी झाल्यानंतर उरलेले अन्न, प्लॉस्टीक कचरा, पात्र, दारूच्या बॉटला अशा प्रकारे उघड्यावर टाकल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरलेली असते.

निरोगी आयुष्यासाठी आपआपल्या परिसराची स्वच्छता राखणे हे सर्व नागरीकांचे कर्तव्य आहे. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे ही सामुहीक जबाबदारी आहे. जे भाविक आपआपल्या भोजणावळी, विविध कार्यक्रम आयोजित करतात त्यांनी कार्यक्रमानंतर स्वच्छता अभियान राबविल्यास हा निसर्गरम्य परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यास निश्चितच मदत मिळेल.

**शहेनाज शेख**

अत्यंत श्रध्देने येणारे भाविक सेमाना देवस्थान परिसरात नको तो कचरा करून या पवित्र परिसराची विटंबना करीत आहेत. डायपर, दारूच्या बॉटला, जेवणवळी नंतर उरलेले साहित्य आपण या मंदिर परिसरात टाकत आहोत याचे साधे भानही ठेवल्या जात नसेल तर याला देवावरची श्रध्दा समजायची काय? आपण सर्वांनी मिळून पुढाकार घेतल्यास हा निसर्गाने नटलेला रमनिय परिसर व देवस्थानचे पावित्र्य निश्चितच राखल्या जाईल. चला सर्व मिळून निर्धार करूया व आपल्या घरादाराप्रमाणेच हा परिसर देखील स्वच्छ ठेवूया.

**विजया मने**







नेहमीप्रमाणे आधारविश्व फाऊंडेशनने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सेमाना देवस्थान परिसरात स्वच्छता अभियान राबवून नागरिकांना पर्यावरण पुरक होळी साजरी करण्याचा संदेश दिला. दिवसागणीक हा परिसर घाणीच्या विळख्यात सापडत आहे. जेवणावळींचे आयोजन झाल्यानंतर उरलेले अन्न उघड्यावर टाकले जाते. प्लॉस्टीकचा कचरा, पत्रावळी, द्रोण, चक्क दारूच्या बाटला या परिसरात टाकुन आपण खरेच देवस्थानचे पावित्र्य जपतो काय ? याचा विचार भाविकांनी करणे गरजेचे आहे.

**गिता हिंगे**
**अध्यक्षा आधार विश्व फाऊंडेशन**

वनविभागाने या परीसरात सुंदर अशा पार्कची निर्मिती केली आहे. या पार्कलगतच असलेल्या सेमाना देवस्थान परिसरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. निदान निरोगी जीवन जगण्यासाठी तरी प्रत्येक भाविकांनी या परीसराची स्वच्छता राखण्याची जबाबदारी घ्यावी असे वाटते.

**पी.पी. म्हस्के**

प्लॉस्टिक निर्मितीवर पूर्णपणे बंदी आणायला पाहिजे. आज स्वच्छता मोहिम राबवित असतांना सेमाना देवस्थान परिसरात सर्रास प्लॉस्टीकचे ग्लास, ताट, प्लेट मोठ्या प्रमाणात उघड्यावर आढळून आले आहेत. उघड्यावरच उरलेले अन्न फेकून दिल्यामुळे परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. नगरपालिका प्रशासनाचे याकडे पुर्णतः दुर्लक्ष होत असून प्रत्येक शनिवारी या परिसरात नगरपालिकेने जनजागृतीचा कार्यक्रम राबवून कचरा करणाऱ्यांवर पायबंद घालावा.

**मिलींद घरोटे,**
**सायलिंग गृप**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आधार विश्व फॉऊंडेशन, व्ही.के.पी. बचत गट व सायकलिंग गृप तर्फे स्वच्छता अभियान राबवून पर्यावरणपुर्वक कचऱ्याची होळी करण्यात आली. स्वच्छता राखणे, पर्यावरणाचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी असून याबाबत प्रत्येकाने जागृक असावे असे वाटते.

**शेमदेव चापले,**
**मुख्याध्यापक, वसंत विद्यालय गडचिरोली.**

देवस्थानच नव्हे तर सर्वच सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे ही सर्वांचीच सामुहीक जबाबदारी आहे. स्वच्छता ही नियमित चालणारी प्रक्रीया असल्यामुळे येणाऱ्या प्रत्येक भाविकाने देवस्थान परिसरात कचरा न टाकण्याची काळजी घेतल्यास निसर्गरम्य असलेल्या या धार्मिक स्थळाचे पावित्र्य राखण्यास मदत होईल.

**प्रा. विनोद चौधरी**

शहरामध्ये प्लॉस्टीकच्या कॅरी बॅग्ज, प्लॉस्टीकचे द्रोण आदी साहित्य सर्रास मिळत आहे. जेवणावळी नंतर सेमाना देवस्थान परिसरात सर्रासपणे हा कचरा उघड्यावर टाकल्या जात आहे. उघड्यावर अन्न टाकल्या जात आहे. दारूच्या बॉटल्स आढळल्या. यावरून धार्मिक स्थळाची विटंबनाच चालून सुरू आहे. सुजाण नागरीकांनी पुढाकार घेवुन हे सर्व आता कुठेतरी थांबवायला पाहिजे.

**प्रा. राजेंद्र हिवरकर**

दरवर्षीपेक्षा या वर्षी सेमाना देवस्थान परिसरात प्रचंड मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा आढळुन आला. परिसर स्वच्छ करून कचऱ्याची पर्यावरण पुरक होळी करण्यात आली. देवस्थान परिसराचे पावित्र्य राखून सर्वांनी स्वच्छता राखल्यास या निसर्गरम्य धार्मिक स्थळाचे पावित्र्य जपण्यास मदत होईल. कुठलाही कार्यक्रम झाल्यानंतर आयोजकांनी पुढाकार घेवून या परिसराची स्वच्छता करावी. मंदिर परिसराच्या आवारातच नगरपालिकेने मोठा कचरा पेटी ठेवली असतानाही या कचरापेटीलगत खुल्या जागेत कचरा टाकला जातो, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

**अश्विनी गुंगारपवार**

नगर पालिका प्रशासनाने सेमाना देवस्थानासह सर्वच सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखण्यास पाऊले उचलण्याची गरज आहे. जनजागृती करणे गरजेचे आहे. मात्र घाण टाकणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई होणे देखील आवश्यक आहे. शहरातील दुकानदारांकडून सर्रास प्लॉस्टीक कॅरी बॅग्ज, पात्र, द्रोण, ग्लास यांची विक्री सुरु आहे. या परिसरात उरलेले अन्न, प्लॉस्टीकचे साहित्य उघड्यावर टाकल्याने अनेक अमुल्य पशुधन हे प्लॉस्टीक गिळंकृत करीत आहेत. भाविकांनी जागरूक होऊन न.प. प्रशासनाने देखील लक्ष देण्याची गरज आहे.

**प्रा. डॉ. भांडारकर**

देशोन्नती

शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर २०१९

# शिवाजी महाविद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू जयंती



पं.नेहरू यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करतांना प्राचार्य डॉ.चिकटे

प्रतिनिधी / १४ नोव्हेंबर

गडचिरोली : स्थानिक शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आज १४ नोव्हेंबर रोजी प्राचार्य डॉ. बि.एस. चिकटे यांच्या अध्यक्षतेखाली पंडीत जवाहरलाल नेहरु यांची जयंती 'बालक दिन' म्हणून साजरी करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की, नव्या जगाची आशा म्हणून नव्या पिढीकडे पाहिले जाते. देशाचे भविष्य म्हणविणाऱ्या बालकांना पाहुन त्यांच्या भविष्याचे काय, असा प्रश्न पडतो. लहान वयात मुलांना योग्य मार्गदर्शन मिळाले तरच ते भविष्यात आदर्श नागरिक होऊ शकतील असेही प्राचार्य डॉ. महशाखेत्री म्हणाले.

या कार्यक्रमास प्रा. जे.जी. उईके, प्रा. एस.पी. ढोमणे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. कैलास भांडारकर, प्रा. डॉ. विलास खुणे, प्रा. डॉ. राजेंद्र गोरे, प्रा. राऊत, प्रा. बावणकर व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत शनिवार, दि. १६ नोव्हेंबर २०१९

14 Nov.

शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली - येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बाल दिन म्हणून साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे होते. यावेळी प्रा. जे. जी. उईके, प्रा. एस. पी. ढोमणे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. कैलास भांडारकर, प्रा. डॉ. विलास खुणे, प्रा. डॉ. राजेंद्र गोरे, प्रा. राऊत, प्रा. बावनकर उपस्थित होते. मार्गदर्शन करताना डॉ. चिकटे म्हणाले, लहान वयात योग्य मार्गदर्शन मिळाल्यास भविष्यात विद्यार्थी आदर्श नागरिक होऊ शकतात.

देशोन्नती
बुधवार, दि. २७ नोव्हेंबर २०१९

# संविधान दिन उत्साहात



शिवाजी महाविद्यालय गडचिरोली

**शिवाजी महाविद्यालय गडचिरोली-** येथे संविधान दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बि.एस. चिकटे उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पी.डी. धोरपडे व डॉ. एम.जे. मेश्राम उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. राकेश करोडकर यांनी भारतरत्न डॉ. बाबासोब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून . २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून राज्यात मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. सन २०१९ हे वर्ष भारतामध्ये संविधान स्विकृतीचे ७० वे वर्ष साजरे होत आहे. भारतीय लोकशाहीच्या या महत्त्वाच घटनेचे स्मरण म्हणून केंद्रशासनाने नागरिकांच्या मुलभूत कर्तव्यांबाबत जनजागृतीकरीता व्यापक राष्ट्रीय मोहिमेची सुरुवात केली असून ही मोहिम २६ नोव्हेंबर २०१९ पासून सुरु होऊन १४ एप्रिल २०२० रोजी म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी समाप्त होईल असे सांगून संविधानाला जोडलेल्या उद्देशपत्रिकेचे वाचन केले.संचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा..एस.पी. ढोमणे यांनी केले तर आभार प्रा. एम.टी. नक्षिणे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यलयातील सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन

लोकमत बुधवार, दि. २७ नोव्हेंबर २०१९

**शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली :** स्थानिक धानोरा मार्गावरील शिवाजी महाविद्यालयात भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पी. डी. घोरपडे, डॉ. एम. जे. मेश्राम उपस्थित होते. याप्रसंगी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. राकेश करोडकर यांनी प्रास्ताविकेतून भारतीय राज्यघटनेच्या विविध कलमांबाबत माहिती दिली. नागरिकांचे अधिकार, कर्तव्य, हक्क याबाबत माहिती दिली. प्राचार्य डॉ. चिकटे म्हणाले, संविधान हा देशाचा सर्वश्रेष्ठ कायदा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रम करून व विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करून सर्व समावेशक असे संविधान भारताला दिले आहे. म्हणून



भारत देश लोकशाही असणारा जगात सर्वात मोठा देश आहे. संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. पी. ढोमणे यांनी केले तर आभार प्रा. एम. टी. नक्षिणे यांनी मानले. यावेळी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**देशोन्नती**

सोमवार, दि. ७ ऑक्टोबर २०१९



शिवाजी महाविद्यालय गडचिरोली

**शिवाजी महाविद्यालय गडचिरोली** - शिवाजी महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ.बी.एस. चिकटे, प्रा. डॉ. पी. डी. धोरपडे, एम.जे. मेश्राम आदी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे शांतता व अहिंसा रॅली काढण्यात आली. संचालन प्रा.डॉ. व्ही.आर. खुणे तर आभार प्रा. आर.एस. कोल्हे यांनी मानले.

# वाचन प्रेरणा दिन डॉ. कलाम यांना अभिवादन

**देशोन्नती** शुक्रवार, दि. १८ ऑक्टोबर २०१९



शिवाजी महाविद्यालय गडचिरोली

**गडचिरोली** : जिल्ह्यातील विविध सामाजिक मंडळे तसेच शाळा, महाविद्यालयात वाचनप्रेरणा दिन उपक्रमातून माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.अब्दुल कलाम यांना अभिवादन करण्यात आले.

**शिवाजी महाविद्यालय गडचिरोली-** येथील ग्रंथालय विभागाच्यावतीने डॉ.कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणुन साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चिकटे होते. प्रमुख अतिथी म्हणुन डॉ.धोरपडे उपस्थित होते. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधुन भव्य ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. संजय राऊत यांनी ग्रंथालय विभागाद्वारे विद्यार्थ्यांना लोकराज्य अंकाचे वितरण केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. संजय राऊत, आभार अजय म्हशाखेत्री यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. खुणे, प्रा.डॉ. मांडारकर, प्रा. करोडकर, प्रा. कोल्हे, ग्रंथालयीन कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# वाचन प्रेरणादिन

पुण्य नगरी
बुधवार, १६ ऑक्टोबर २०१९



गडचिरोली : शिवाजी महाविद्यालयातील ग्रंथालय



विभागाद्वारे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दूल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणादिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी.एस. चिकटे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. पी.डी. घोरपडे उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी डॉ.एपीजे अब्दूल कलाम यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून ग्रंथालय विभागाने ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. संचालन प्रा. संजय राऊत तर आभार अजय म्हशाखेत्री यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. व्ही.आर. खुणे, प्रा.डॉ. के आर. भांडारकर, प्रा. आर.पी. करोडकर, प्रा.आर. एम. कोल्हे तसेच ग्रंथालयातील कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

देशोन्नती
गुरुवार, दि. १० ऑक्टोबर २०१९



शिवाजी महाविद्यालय गडचिरोली

**शिवाजी महाविद्यालय गडचिरोली-** येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ.चिकटे, प्रा.उईके, प्रा.ढोमणे, प्रा.डॉ.राजेंद्र गोरे उपस्थित होते.जिल्हाधिकारी शेखर सिंह यांनी रॅलीस हिरवी झेंडी दाखविली.ही-रॅली महाविद्यालयाच्या प्रांगणातून इंदीरा गांधी चौक मार्गाने परत महाविद्यालयात आली. या ठिकाणी रॅलीचा समारोप करण्यात आला.यावेळी प्रा.नंदागवळी, प्रा.डॉ.भांडारकर,प्रा.बावणकर, प्रा.म्हशाखेत्री यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# वाचनाने डॉ.अब्दुल कलाम यांना अभिवादन

लोकमत शुक्रवार, दि. १८ ऑक्टोबर २०१९

**गडचिरोली :** देशाचे दिवंगत राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून जिल्हाभर ठिकठिकाणी मंगळवारी साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त विविध उपक्रम शाळा-महाविद्यालयांमध्ये राबविण्यात आले.

**शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली** - येथे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पी. डी. घोरपडे, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. संजय राऊत उपस्थित होते. यावेळी डॉ. भूपेश चिकटे, डॉ. घोरपडे यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्यावर विचार व्यक्त केले. प्रा. संजय राऊत यांनी वाचन प्रेरणा दिनामागील पार्श्वभूमी सांगितली. दरम्यान ग्रंथालय विभागातर्फे विद्यार्थ्यांना लोकराज्य मासिक वितरित करण्यात आले. आभार अजय महशाखेत्री यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. विलास खुणे, डॉ. के. आर. भांडारकर, प्रा. आर. पी. करोडकर, प्रा. आर. एस. कोल्हे व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

पुण्यनगरी
सोमवार, ३० सप्टेंबर २०१९

## शिवाजी महाविद्यालयातर्फे वृक्षारोपण

गडचिरोली : शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे प्राचार्य डॉ. बी.एस. चिकटे, प्रा.जे.जी. ऊईके, प्रा. एस.पी. ढोमणे यांच्या नेतृत्वात शासन निर्णयान्वये ३३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत मुरखळा येथे ८९८ रोपट्याचे वृक्षारोपण करण्यात आले. यात जांभुळ, कडूनिंब, चिंच, खैर, आवळा, शिवन, बेहडा आदी वृक्षांची लागवड करण्यात आली. याप्रसंगी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. यशस्वीतेसाठी उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी तसेच वनविभाग, सामाजिक वनिकरण, रासेयो स्वयंसेवक, महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

www.tarunbharat.net
तरुण भारत
सोमवार, ३० सप्टेंबर २०१९

## मुरखळा परिसरात वृक्ष लागवड

**गडचिरोली :** येथील शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयो विभागातर्फे प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे, प्रा. जे. जी. उइके, प्रा. एस. पी. ढोमणे यांच्या नेतृत्वात शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत मुरखळा या गावातील परिसरात ८९८ रोपट्यांची लागवड करण्यात आली. यात जांभूळ, कडूनिंब, चिंच, खैर, आवळा, शिवन, बेहडा आदी जातींच्या वृक्षांचा समावेश होता. वृक्ष लागवड अंतर्गत २१ ऑगस्टला दोनशे, २८ ऑगस्टला ४०० व २१ सप्टेंबरला २९८ वृक्षांची लागवड करण्यात आली. शासनाच्या या उपक्रमाला गडचिरोलीचे उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी, सामाजिक वनीकरण, रासेयो स्वयंसेवक, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

**देशोन्नती**
गडचिरोली
शुक्रवार, दि. ६ सप्टेंबर २०१९

# विद्यार्थ्यांनी गुरूविषयी आदर बाळगावा

## प्राचार्य डॉ. चिकटे यांचे प्रतिपादन, शिवाजी महाविद्यालयात शिक्षक दिन



*प्रतिनिधी/ ५ सप्टेंबर*

**गडचिरोली :** जिवनात गुरूशिवाय यश, कीर्ती, पैसा मिळु शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी गुरूविषयी आदर बाळगावा असे प्रतिपादन शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे यांनी केले.

स्थानिक शिवाजी महाविद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णनन यांची जयंती शिक्षक दिन म्हणुन साजरी करण्यात आली. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

या कार्यक्रमाला व्यासपीठावर प्रमुख वक्ते म्हणुन प्रा. डॉ. एम.जे.मेश्राम, प्रा. डॉ. व्ही.आर.खुणे, प्रा. डॉ. के. आर.भांडारकर तसेच प्रमुख अतिथी म्हणुन प्रा. आर.एस.कोल्हे, प्रा. आर.के. नंदागवळी, प्रा. एस.पी.ढोमणे, प्रा. जे.जी.उईके, प्रा. डॉ. आर.पी.करोडकर, प्रा.डॉ. आर.एस.गोरे, प्रा.एस.सी.राऊत व इतर प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावरून मार्गदर्शन करतांना प्रा. डॉ. एम.जे.मेश्राम यांनी विद्यार्थी जिवनात शिक्षकांचे किती महत्व आहे हे पटवुन दिले. तर प्रा. डॉ. व्ही.आर.खुणे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णनन यांच्या जिवनावर प्रकाश टाकला. यावेळी काही विद्यार्थी व प्राध्यापकांनीसुध्दा आपली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी, विद्यार्थींनी उपस्थित होते.

**पुण्य नगरी**
सोमवार
२ सप्टेंबर २०१९

...र आभार आशय गाठे यांनी मानले.

# शिवाजी महाविद्यालयातर्फे पूरग्रस्तांना मदत



गडचिरोली : शिवाजी महाविद्यालयातर्फे कोल्हापूर, सातारा, सांगली व भामरागड येथील पूरग्रस्तांना पावने तीन लाख रुपयांच्या साहित्याची मदत करण्यात आली. गेल्या काही दिवसापासून पश्चिम महाराष्ट्र व गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड येथील पूरग्रस्तांना मदतकार्य करावे या उदात्त हेतूने संस्थेचे अध्यक्ष अनिल पाटील म्हशाखेत्री, उपाध्यक्ष के के पाटील भोयर, सचिव देवराव म्हशाखेत्री, सदस्य डी.एन. चापले, प्राचार्य डॉ. चिकटे, प्रा.डॉ. पी.डी. घोरपडे, उईके, ढोमणे, गोरे, भांडारकर, कोल्हे, करोडकर यांच्या नेतृत्वात समाजातील डॉक्टर, व्यापारी वर्ग व इतर व्यावसायिकांकडून साहित्य सामुग्रीचे संकलन करण्यात आले. यामध्ये डॉ. शिवनाथ कुंभारे, डॉ. कोवे, पंजवानी ट्रेडर्स, लाजरी कपडा मॉल, परिधान कपडा मॉल, मुस्कान कपडा शॉप, किशोर ट्रेडर्स, अंबे माँ शॉप, सुमंत मोहितकर मेडिकल शॉप, हर्ष ज्वेलर्स आदींनी मदतीचा हात दिला.

**तरुण भारत**
बुधवार, ११ सप्टेंबर २०१९

# शिवाजी महाविद्यालयात शपथविधी व रॅलीचे आयोजन

**गडचिरोली :** येथील शिवाजी महाविद्यालयात रासेयो आणि शारीरिक शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शपथविधी व रॅलीचे आयोजन केले होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे, प्रा. डॉ. राजेंद्र गोरे, प्रा. जे. जी. उईके, प्रा. एस. पी. ढोमणे, प्रा. डॉ. पी. डी. घोरपडे आदी उपस्थित होते. सर्वांनी दररोज सकाळी किमान १ हजार पावले चालण्याची शपथ घेतली. यशस्वितेसाठी प्रा. करोडकर, प्रा. भांडारकर, प्रा. खुणे, प्रा. कोल्हे व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. ■

राष्ट्रीय क्रिडा दिन
29 August

पुण्यनगरी ३१ ऑगस्ट १९

पुण्यनगरी 31.08.19

# शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने रॅली



गडचिरोली : येथील शिवाजी महाविद्यालयात रासेयो विभाग व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (२९ ऑगस्ट) सकाळी १० वाजता राष्ट्रीय क्रीडादिन साजरा करण्यात आला. क्रीडादिनाचे औचित्य साधून शपथविधी व रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र घोरे, प्रा. जे. जी. उईके, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. पी. ढोमणे, प्रा. डॉ. पी. डी. घोरपडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे म्हणाले, देशामध्ये राष्ट्रीय क्रीडादिन हा मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी का साजरा केला जातो तसेच दैनंदिन जीवनात खेळाचे महत्व काय असते याबाबत मार्मीक विवेचन देऊन जीवनात निर्णय घेण्याची ताकद ज्या व्यक्तीच अंगात तो भूतकाळ काय घडल याचा विचार न करता वर्तमान आणि भविष्यकाळाचा विचार करून पुढे चालतो. यानंतर सर्वांनी दररोज सकाळी किमान १००० पाऊले चालण्याची शपथ घ्यावी, असे त्यांनी आवाहन केले. यशस्वीतेसाठी प्रा. करोडकर, प्रा. भांडारकर, प्रा. खुणे, प्रा. कोल्हे, प्रा. नंदागवळी, प्रा. राऊत, प्रा. नक्षिणे, प्रा. ताजणे यांच्यासह प्राध्यापकवृंद व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# शिवाजी महाविद्यालयाच्यावतीने पुरग्रस्तासाठी पावणेतीन लाखांच्या साहित्याची मदत

## कपडे, औषधे, चादरी, सॅनिटरी नॅपकिन, कोरडे खाद्य पदार्थ, ब्लॅकिट्स, साड्या, धान्य, जीवनावश्यक साहित्यांचा समावेश

**प्रतिनिधी / १ सप्टेंबर**

**गडचिरोली :** स्थानीक शिवाजी महाविद्यालयातर्फे कोल्हापूर, सांगली व भामरागड येथील पुरग्रस्तांसाठी पावण तिन लाख रूपयांच्या साहित्यांची मदत करण्यात आली आहे.

यामध्ये कपडे, औषधे, चादरी, सॅनिटरी, नॅपकिन, कोरडे खाद्य पदार्थ, ब्लॅकिट्स, साड्या, धान्य, जीवनावश्यक इतर वस्तुंचा समावेश आहे.

गेल्या काही दिवसापासून पश्चिम महाराष्ट्रात व गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड येथील पुरग्रस्तांना मतदकार्य करावे या उदात्त हेतुने शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अनिल पाटील म्हशाखेत्री, संस्थेचे उपाध्यक्ष के.के. पाटील भोयर, सदस्य डि.एन. चापले, सचिव देवराव पाटील म्हशाखेत्री, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बि.एस. चिकटे, प्रा. डॉ. पि.डी. घोरपडे, प्रा. जे.जी. उईके, प्रा. एस.पि. ढोमणे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेन्द्र गोरे, प्रा. भांडारकर, प्रा. कोल्हे, प्रा. करोडकर यांच्या नेतृत्वात समाजातील डॉक्टर, व्यापारी वर्ग व इतर प्रकारचे



व्यावसायीक यांच्याशी संपर्क साधून साहित्यसामुग्रीचे संकलन करण्यात आले.

यामध्ये सुमारे दिडशे ते दोनशे लोकांनी सढळ हाताने मदत देऊ केली. यामध्ये डॉ. शिवनाथ कुमारे, डॉ कोवे, पंजवानी ट्रेडर्स, लाजरी कपडा मॉल, परिधान कपडा मॉल, मुस्कान कपडा शॉप, किशोर ट्रेडर्स, अंबे माँ शॉप, सुमंत मोहीतकर मेडीकल शॉप, हर्ष ज्वेलर्स व इतर व्यापाऱ्यांनी भरगच्च प्रमाणात मदतीचा हात दिला.

या मदतकार्याला उत्तमरित्या यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील संपुर्ण प्राध्यापकवृंद तसेच सुरज मोहुर्ले, चेतन कोलते, सानोबर सय्यद, सानिया पठाण, विक्की पोहरकर व इतर स्वयंसेवकांनी मोलाचे सहकार्य केले.

गोळा करण्यात आलेले साहित्य गोंडवाना विद्यापीठाच्या सुपुर्द करण्यात आले. महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक केल्या जात आहे.

देशोन्नती 2.09.19

27 August, 2019

लोकमत शनिवार, दि. ३१ ऑगस्ट २०१९



# शिवाजी महाविद्यालयात निवड शिबिर

गडचिरोली : येथील शिवाजी महाविद्यालयात मंगळवारी राष्ट्रीय व राज्यस्तरीय पतसंचलन पूर्व प्रशिक्षण तसेच आपत्ती व्यवस्थापन जिल्हास्तरीय निवड शिबिर घेण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे होते. स्वयंसेवकांना जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर विशिष्ट गुण आत्मसात करणे आवश्यक आहे. या गुणामुळेच व्यक्तीची पारख होते, असे प्रतिपादन डॉ. चिकटे यांनी केले. यावेळी विद्यापीठाचे रासेयो विभागाचे संचालक डॉ. नरेश मडावी, प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर, प्रा. मंगला बन्सोड, प्रा. पवन नाईक, प्रा. प्रदीप चापले, प्रा. संदीप मैंद, प्रा. गणेश चुधरी, डॉ. राजेंद्र गोर उपस्थित होते. संचालन एस. पी. डोमणे, प्रास्ताविक डॉ. जे. जी. उईके तर आभार चंचल रोहणकर यांनी मानले.

पुण्य नगरी

सोमवार, दि. २ सप्टेंबर २०१९

## शिवाजी महाविद्यालयातील स्वयंसेवकाची आपत्ती व्यवस्थापन पुर्व प्रशिक्षणासाठी निवड



गडचिरोली : स्थानिक शिवाजी महाविद्यालय गडचिरोली येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक विक्की प्रशांत पोहरकर याची राष्ट्रीय व राज्यस्तरीय पथ संचलन पुर्व प्रशिक्षण व आपत्ती व्यवस्थापन निवड शिबिरामध्ये जिल्हास्तरावर निवड करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बि.एस. चिकटे यांच्या हस्ते या स्वयंसेवकाला गौरविण्यात आले. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य डॉ. बि.एस. चिकटे , प्रा. डॉ. राजेंन्द्र गोरे, प्रा. एस.पि. डोमणे, प्रा. जे.जी. उईके यांना दिले.

सकाळ
गडचिरोली, शुक्रवार, ३० ऑगस्ट २०१९



## शपथ चालण्याची

गडचिरोली : येथील शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडादिनानिमित्त विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी सुदृढ आरोग्यासाठी दररोज एक हजार पावले चालण्याची शपथ घेताना विद्यार्थी.

लोकमत मंगळवार, दि. ३ सप्टेंबर २०१९

# पावणे तीन लाखांच्या साहित्यांची मदत

## रासेयोचा पुढाकार : पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात



शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयो पथकातर्फे काढलेली मदत निधी रॅली.

लोकमत न्यूज नेटवर्क

गडचिरोली : स्थानिक शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयो पथकातर्फे गडचिरोली शहरात दोन ते तीन दिवस रॅली काढून कोल्हापूर, सातारा, सांगली व भामरागड येथील पूरग्रस्तांसाठी पावणे तीन लाख रुपये किंमतीचे साहित्य संकलित करण्यात आले. हे साहित्य गोंडवाना विद्यापीठ प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आले.

पावणे तीन लाखांच्या साहित्यांमध्ये कपडे, औषधी, चादर, सॅनिटरी नॅपकिन, कोरडे खाद्य पदार्थ, ब्लॅंकेट्स, साड्या, धान्य तसेच जीवनावश्यक इतर वस्तूंचा समावेश आहे. शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या मदत रॅलीच्या शुभारंभाप्रसंगी शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिल म्हशाखेत्री, उपाध्यक्ष के.के.भोयर, सदस्य डी.एन.चापले, सचिव देवराव म्हशाखेत्री, प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे, प्रा. डॉ. पी. डी. घोरपडे, प्रा. जे. जी. उईके, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.पी.डोमणे, प्रा.डॉ.राजेंद्र गोरे, प्रा.भांडारकर, प्रा.कोल्हे, प्रा.राकेश कोडकर आदी उपस्थित होते.

यावेळी रासेयो स्वयंसेवकांनी चामोर्शी रोड, धानोरा रोड तसेच त्रिमूर्ती चौकातून बाजारपेठेत रॅली काढून विविध साहित्य गोळा केले. सदर साहित्य विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.एन.व्ही.कल्याणकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

लोकमत बुधवार, दि. २१ ऑगस्ट २०१९

15 August



## शिवाजी महाविद्यालयात वृक्षारोपण

गडचिरोली : स्थानिक शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता पंधरवड्यांतर्गत परिसर स्वच्छता व वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे यांनी स्वत: स्वच्छतेची सुरुवात केली. त्यानंतर प्राध्यापक, कर्मचारी, रासेयो स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात झाडू लावून स्वच्छता केली. यावेळी प्राचार्य डॉ. चिकटे, डॉ. पी. डी. घोरपडे यांनी मार्गदर्शन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. पी. ढोमणे यांनी स्वच्छतेचा संकल्प करण्याचे सांगितले. त्यानंतर महाविद्यालय परिसरात अशोका, नीलगिरी, पाम, कडूनिंब आदींचे रोपे लावण्यात आली. प्रा. जे. जी. उईके, प्रा. डॉ. विलास खुणे, प्रा. राकेश करोडकर यांनी सहकार्य केले.

पुण्य नगरी

शुक्रवार
२३ ऑगस्ट २०१९

## शिवाजी महाविद्यालयात उद्‌बोधन कार्यशाळा



गडचिरोली : येथील शिवाजी महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथालय उद्‌बोधन कार्यशाळा बुधवारी पार पडली.

कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. बी.एस. चिकटे यांनी केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. चिकटे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची वैशिष्ट्ये सांगितली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन कार्यक्रमात सहभाग नोंदवून आपला बौद्धिक व शारीरिक विकास साधावा व आपला अमुल्य वेळ वाया न घालवता ग्रंथालयाचा उपयोग करून ज्ञान संपन्न व्हावे, असे आवाहन केले. प्रा. राऊत यांनी ग्रंथालय विभागातील विविध विभागांची माहिती दिली व ग्रंथालय विभागाद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सेवांची ग्रंथालय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली. यावेळी प्रा.डॉ. आर.एस. गोरे, प्रा. रुपेश कोल्हे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. संजय राऊत यांनी केले. संचालन प्रा.डॉ. व्ही. आर. खुणे तर आभार प्रा. एम.टी. नक्षिणे यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

**देशोन्नती**

गडचिरोली
दि. २० ऑगस्ट २०१९

# शिवाजी महाविद्यालयात स्वच्छता पंधरवडा अंतर्गत परिसर स्वच्छता , वृक्षारोपण

**प्रतिनिधी / १९ ऑगस्ट**

**गडचिरोली** : स्थानिक शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता पंधरवडा अंतर्गत परिसर स्वच्छता व वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला.

प्राचार्य डॉ. बी.एस.चिकटे यांनी स्वतः स्वच्छतेची सुरुवात केली. त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकवृंदानी स्वच्छता करणे हे आपले कर्तव्य आहे असे मानुन महाविद्यालयातील संपुर्ण परिसर स्वच्छ केला.



यानंतर महाविद्यालयात स्वच्छतेविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. बि.एल.चिकटे यांनी गांधीजींच्या जीवनावर प्रकाश टाकतांना गांधीजी कसे स्वच्छतेचे भोक्ते होते व त्यांनी स्वच्छतेला कसे महत्व दिले याबद्दल मार्मीक मार्गदर्शन केले.

प्रा. डॉ. पि.डी. घोरपडे यांनी स्वच्छतेच्या संदर्भात माहिती देवुन स्वच्छता हे काम नसुन चांगली सवय आहे असे सांगुन या कामासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. एस.पि.ढोमणे यांनी '' स्वच्छ संकल्प पासुन स्वच्छ सिध्दी '' चे आवाहन केले.

यानंतर वर्गखोली, पाण्याची टाकी, शौचालय स्वच्छ करण्यात आले व शेवटी महाविद्यालयीन परिसरात अशोका, निलगिरी , कडुनिंब आदींचे रोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता प्रा. जे.जी.उईके, प्रा. डॉ. विलास खुणे, प्रा. भांडारकर, प्रा. करोडकर, प्रा. डॉ. गोरे, प्रा.नक्षिणे, प्रा. कोल्हे, प्रा. नंदा गवळी व इतर संपुर्ण प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

**लोकमत** गुरुवार, दि. १५ ऑगस्ट २०१९

# स्टॅन्ड-अप कॉमेडी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## बक्षिसाने गौरव : हिरालाल सहारे प्रथम तर सोनाली निस्ताने द्वितीयस्थानी

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडचिरोली** : महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यीक पु.ल.देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्य शासनाच्या वतीने स्टॅन्ड-अप कॉमेडी स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्रातील सर्वच ३६ जिल्ह्यात करण्यात आले. गडचिरोलीची जिल्हास्तरीय ही स्पर्धा स्थानिक शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात घेण्यात आली. यास्पर्धेत हिरालाल सहारे यांनी प्रथम तर सोनाली निस्ताने हिने द्वितीय क्रमांक पटकाविला.



विजेत्या कलावंतांसोबत प्राचार्य डॉ.बी.एस.चिकटे व अन्य मान्यवर.

सदर स्पर्धेत जिल्हाभरातून एकूण १२ कलावंतांनी सहभाग नोंदविला. यात हिरालाल सहारे यांनी पु.ल.देशपांडे यांच्या 'हरी तात्या' या साहित्यावर प्रयोग सादर करून २० हजार रुपयांचे प्रथम बक्षीस मिळविले. सोनाली निस्ताने हिने 'फुलराणी' या नाटकावरील मंजुळेची व्यक्तीरेखा सादर करून १५ हजार रुपयांचे द्वितीय बक्षीस मिळविले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एस.चिकटे यांच्या हस्ते दोन्ही विजेत्यांना रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आला. गडचिरोली जिल्हा हा कलावंतांची खाण आहे, अशा शब्दात प्राचार्य चिकटे यांनी कलावंतांचा गौरव यावेळी केला. स्पर्धेचे समन्वयक म्हणून प्रा.डॉ.विलास खुणे यांनी काम पाहिले. परीक्षक म्हणून नाटककार व दिग्दर्शक डॉ.सतीश कावळे, कलाकार देवेंद्र दोडके, शशांक केयटे यांनी काम पाहिले.

सदर दोन विजेत्या कलावंतांना राज्यस्तरावर सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

देशोन्नती
गडचिरोली
गुरूवार, दि. २२ ऑगस्ट २०१९

# विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमात सहभागी व्हावे

## शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चिकटे यांचे प्रतिपादन, ग्रंथालय विभागातर्फे कार्यशाळा

प्रतिनिधी/२१ ऑगस्ट

**गडचिरोली :** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमात सहभागी होऊन आपला शारीरीक व बौध्दीक विकास साधावा असे प्रतिपादन स्थानिक शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एस. चिकटे यांनी केले. शिवाजी महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने उद्‍बोधन कार्य शाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते उद्‍घाटक म्हणुन बोलत होते.



प्रमुख अतिथी म्हणुन प्रा. संजय राऊत, प्रा. डॉ. आर.एस.गोरे, प्रा. डॉ. व्ही.आर.खुणे, प्रा. रुपेश कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. चिकटे पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना सारख्या उपक्रमामध्ये सहभागी व्हावे, या माध्यमातुन आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करावा असेही आवाहन त्यांनी केले.

प्रा. संजय राऊत यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालय विभागातील विविध विभागांची माहिती दिली व ग्रंथालय विभागाद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सेवा, ग्रंथालय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग करुन स्वतःचा बौध्दीक विकास कसा साधता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. आर.एस. गोरे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात खेळण्यात येणाऱ्या खेळांची माहिती दिली व क्रिडा क्षेत्राच्या माध्यमातुन आपला शारीरीक विकास कसा साधावा व खेळांच्या माध्यमातुन आपले भविष्य कसे उज्वल करता येईल यावर मार्गदर्शन केले.

प्रा. डॉ. व्ही.आर. खुणे यांनी विद्यार्थ्यांना आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे महत्व पटवुन दिले. विद्यार्थ्यांनी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या उपक्रमात सहभाग घेवुन आपला सर्वांगिण विकास साधावा असे सांगितले. प्रा. रुपेश कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभागाबद्दल मार्गदर्शन केले व महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवुन आपल्या सुप्त गुणांचा विकास साधावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संजय राऊत यांनी केले, संचालन प्रा. व्ही.आर.खुणे यांनी केले तर आभार प्रा. एम.टी. नक्षिणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता सर्व महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

देशोन्नती
नागपूर / गुरुवार, दि. १५ ऑगस्ट २०११

# शिवाजी महाविद्यालयात ग्रंथपाल दिन

प्रतिनिधी /१४ ऑगस्ट

**गडचिरोली:** स्थानिक शिवाजी महाविद्यालय गडचिरोली येथे आज ग्रंथालय



विभागाच्या वतीने भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर रंगनाथन यांची जयंती ग्रंथपालदिन म्हणुन साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एस.चिकटे होते. कार्यक्रमाचे औचित्य साधुन ग्रथालय विभागाव्दारे भव्य ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. प्रा.एस.सी.राऊत यांनी डॉ. एस. आर.रंगनाथन यांच्या चळवळीतील योगदान यावर उजाळा दिला व विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचे महत्व पटवून दिले. याप्रसंगी डॉ.एम.जे. मेश्राम, डॉ.एस.आर.गोरे, डॉ.खुणे, डॉ.करोडकर, प्रा. कोल्हे, प्रा.ढोमणे, प्रा.उईके,उपस्थित होते. तसेच बहूसंख्येने विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला व महा.शिक्षकेतर कर्मचारी व ग्रंथालय कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीरीत्या पार पाडण्यात सहयोग नोंदवला. कार्यक्रमाचे संचालन अजय म्हशाखेत्री यांनी केले तर आभार सुयोग वाकडे यांनी मानले.

देशोन्नती
गडचिरोली
बुधवार, दि. १४ऑगस्ट २०१९

# हिरालाल सहारे यांनी जिंकली स्टॅन्डअप कॉमेडी स्पर्धा

## विजेत्यांना स्पर्धेच्या अंतिम फेरीत सादरीकरणाची मिळणार संधी



प्रतिनिधी / १३ ऑगस्ट

गडचिरोली :-महाराष्ट्राचे लाडके व्यक्तीमत्व पु.ल.देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने राज्य शासनामार्फत स्टॅन्ड- अँप कॉमेडी स्पर्धाचे आयोजन राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात केले होते. गडचिरोली जिल्ह्यात ही स्पर्धा शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात पार पडली. या स्पर्धेत जिल्ह्यातील १२ कलावंतानी सहभाग घेतलेला होता. त्यात हिरालाल सहारे यांनी पु.ल.देशपांडे यांच्या हरी तात्या या साहित्यावर प्रयोग सादर करुन २०,००० रुपयाचे प्रथम तर सोनाली निस्ताने हिने फुलराणी या पु.ल. च्या नाटकावरील मंजुळेची व्यक्तीरेखा सादर करुन १५,००० रुपयाचे द्वितीय पारितोषीक पटकावले.

पारितोषीक वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एस. चिकटे होते. परीक्षक म्हणुन परिक्षक म्हणुन सुप्रसिध्द नाटककार व दिग्दर्शक डॉ. सतीश पावडे, अभिनेता देवेंद्र दोडके, शशांक केवटे आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तीमत्व व प्रसिध्द साहित्यीक पु.ल.देशपांडे यांच्या जन्मशताब्दी निमित्त सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने महाराष्ट्रभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत पु.ल.च्या साहित्यावर आधारीत स्टॅन्ड- अँप कॉमेडी(एकपात्री अभिनय) राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात येत आहे. या स्पर्धेत गडचिरोली केंद्राची प्रथम फेरी पु.ल.मय वातावरणात पार पडली. विजेत्यांना मान्यवरांच्याहस्ते रोख पारितोषीक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.चिकटे यांनी गडचिरोली ही कलावंताची खाण असल्याचे सांगुन जिल्ह्यातील कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे सांगितले.

मराठी भाषा विभाग, सांस्कृतिक संचालनालय व सोनी वाहिनीच्या मार्फत राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या केंद्रावर पात्र ठरणाऱ्या निवडक विजेत्यांना स्पर्धेच्या अंतीम फेरीत सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे. महाराष्ट्रातील विनोदी कलावंताचे टॅलेंट हंट करण्याचा प्रयत्न या स्पर्धेच्या निमित्ताने राज्य शासन करणार आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील या स्पर्धेचे समन्वयक म्हणुन प्रा. डॉ. विलास खुणे यांनी यशस्वीपणे काम पार पाडले. या स्पर्धेचे संचालन प्रा. खुणे यांनी केले.

देशोन्नती
गडचिरोली
गुरुवार, दि. १५ऑगस्ट २०१९

# शिवाजी महाविद्यालयात स्वच्छता पंधरवाडा रॅली

## बसस्थानक परिसरात राबविली स्वच्छता मोहीम, विद्यार्थ्यांचा सहभाग



प्रतिनिधी/ १४ ऑगस्ट

गडचिरोली : स्थानिक शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत स्वच्छता पंधरवाडा रॅली काढून बसस्थानकाता स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बि.एस.चिकटे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.जे.जी.उईके, प्रा.एस.पी.ढोमणे यांच्या नेतृत्वात स्वच्छता रॅली काढण्यात आली. महाविद्यालयातील रा.से.यो स्वयंसेवकांनी बॅनर्स, फलक, दाखवून स्वच्छता जनजागृती केली. यामध्ये बस स्थानकावरील केरकचरा, प्लास्टीक, शौचालय साफ करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.विलास खुणे, प्रा. राउत, प्रा.डॉ.गोरे, प्रा.डॉ.आर. पि करोडकर, समस्त प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले. यावेळी बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# महाविद्यालयात विविध उपक्रम

देशोन्नती
गडचिरोली
रविवार, दि. ११ ऑगस्ट २०१९

मोहीम — अनेक शाळात जागतिक आदिवासी दिन,

9 Aug.




शिवाजी महाविद्यालय गडचिरोली

**शिवाजी महाविद्यालय गडचिरोली-** येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ९ ऑगस्ट २०१९ 'क्रांती दिन' प्राचार्य डॉ. बी.एल.चिकटे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.प्रमुख अतिथी प्रा. कोल्हे, प्रा. डॉ. गोरे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता प्रा. माडारकर, प्रा. उईके, प्रा. डॉ. विलास खुणे, प्रा. करोडकर, प्रा. राऊत यांनी सहकार्य केले. संचालन प्रा. स्वप्निल ढोमणे यांनी केले व आभार प्रा. नक्षिणे यांनी मानले.

पुण्य नगरी
गुरुवार
ऑगस्ट २०१९

14 Aug

## शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने स्वच्छता मोहीम



**गडचिरोली :** स्थानिक शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने बुधवारी (१४ ऑगस्ट) स्वच्छता पंधरवडा कार्यक्रमांतर्गत बसस्थानक परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच जनजागृती रॅली काढण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे, प्रा. जे.जी. उईके, प्रा. जे.जी. उईके, प्रा. एल.पी. ढोमणे यांच्या उपस्थितीत रॅली काढण्यात आली. या रॅलीतून शहरवासीयांना स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. विलास खुणे, प्रा. [illegible]

देशोन्नती
गडचिरोली
मंगळवार, दि. १६ जुलै २०१९

# स्टॅन्ड अप कॉमेडी स्पर्धेतून मिळणार कलागुणांना वाव

**स्पर्धा** ५ ऑगस्टला गडचिरोली येथील शिवाजी महाविद्यालयात स्टँड अप कॉमेडी स्पर्धेचे आयोजन

**प्रतिनिधी / १५ जुलै**

**गडचिरोली : शिवाजी महाविद्यालयात राज्य शासनामार्फत ५ ऑगस्टला स्टॅन्ड-अप कॉमेडी स्पर्धाचे आयोजन राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात केले आहे. गडचिरोली जिल्ह्यात ही स्पर्धा शिवाजी महाविद्यालय गडचिरोली येथे ५ ऑगस्टला होत आहे. या स्पर्धेतून कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच रोख पारितोषीकही मिळणार आहेत.**

विनोद हा पु.ल.देशपांडे यांच्या साहित्याचा अविभाज्य भग आहे. समाजातील माणसांच्या वृत्तीवर आपल्या खुमासदार शैलीत पुलंनी कायम भाष्य केले. स्टॅन्ड-अप कॉमेडी ही स्पर्धा देखील अशाच स्वरूपाची होणार आहे.

पु.ल. देशपांडे लिखित एकांकिका, नाटक, कथा ललित लेख अशा कोणत्याही साहित्य प्रकारातून निवडलेल्या भागाचे दोन मिनीटांचे सादरीकरण मोबाईल किंवा इतर कॅमेऱ्याने चित्रीत करून इच्छुक स्पर्धकांनी ७५०६८४८०५५ या व्हॉट्सअप क्रमांकावर १ ऑगस्ट २०१९ पर्यंत पाठवावे. या चित्रीत केलेल्या सादरीकरणापुर्वी आपले नाव, पत्ता व वय संपर्कासाठीचा अतिरिक्त दूरध्वनी क्रमांक आणि पु.ल. देशपांडे यांच्या कोणत्या कलाकृतीतून आपल्या सादरीकरणाचा उतारा निवडलेला आहे.



याचा संदर्भ देणे आवश्यक आहे. यातून निवड करण्यात आलेल्या स्पर्धकाला केंद्रावर ७ ते ८ मिनिटे सादरीकरण करावयाचे आहे. या स्पर्धेत १२ वर्षा पुढील वयोमान असलेले स्पर्धक सहभागी होऊ शकतील.

स्टॅन्ड-अप कॉमेडी स्पर्धेतील विजेत्याला २० हजार रूपये आणि उपविजेत्याला १५ हजार रूपये अशी रोख स्वरूपाची बक्षीसे देण्यात येणार आहेत.

सकाळी १० ते दुपारी २ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत स्पर्धेचे आयोजन केले आहे. या संपूर्ण उपक्रमांचे प्रक्षेपण सोनी मराठी वाहिनीवरून केले जाणार आहे. या स्पर्धेत भरभरून प्रतिसाद देण्याचे आवाहन शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एस. चिकटे व समन्वयक प्रा. डॉ. विलास खुणे यांनी केले आहे. पु.ल. देशपांडे यांनी आपल्या नर्मविनोदी शैलीतुन मार्मीक भाष्य करतानाच समाजाला खळखळून हसवून सोडले होते. त्यांच्या पश्चातही त्यांचे साहित्य वाचतांना पुलंची आठवण येते. आता या स्पर्धेतुन प्रेक्षकांनाही प्रत्यक्ष अनुभूती घेता येणार आहे.

पुण्य नगरी
मंगळवार
१६ जुलै २०१९

# शिवाजी महाविद्यालयात स्टँडअप कॉमेडी स्पर्धा

## राज्य शासनातर्फे ५ ऑगस्ट रोजी आयोजन

चामोर्शी : महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु.ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने राज्य शासनाच्या वतीने स्टँडअप कॉमेडी स्पर्धेचे आयोजन राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये करण्यात आले आहे. जिल्ह्यात ही स्पर्धा शिवाजी महाविद्यालयात ५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली आहे. विनोद हा पुलंच्या साहित्याचा अविभाज्य भाग आहे. समाजातील माणसांच्या वृत्तीवर आपल्या खुमासदार शैलीत पुलंनी कायम भाष्य केले. ही स्पर्धा सुद्धा अशाच स्वरूपाची होणार आहे. पु.ल. देशपांडे लिखित एकांकिका, नाटक, कथा, ललीत लेख अशा कोणत्याही साहित्य प्रकारातून निवडलेल्या भागाचे दोन मिनीटांचे सादरीकरण मोबाईल किंवा इतर कॅमेऱ्याने चित्रित करून स्पर्धकांनी १ ऑगस्टपर्यंत पाठवावयाचे आहे. यासोबतच आपले नाव, पत्ता व संपर्क व पु.ल. देशपांडे यांच्या कोणत्या कलाकृतीतून आपल्या सादरीकरणाचा उतारा निवडलेला आहे, याचा संदर्भ देणे आवश्यक आहे. यातून निवड करण्यात आलेल्या स्पर्धकाला केंद्रावर ७ ते ८ मिनीटे सादरीकरण करावयाचे आहे. या स्पर्धेत १२ वर्षापुढील वयोमान असलेले स्पर्धक सहभागी होऊ शकतील. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षीसासह गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेला भरभरून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एस. चिकटे व समन्वयक प्रा.डॉ. विलास खुणे यांनी केले आहे.

11 July

लोकमत शुक्रवार, दि. १२ जुलै २०१९ २

छायांकित जिल्हा



## तंबाखू व्यसनमुक्तीची शपथ

गडचिरोली : स्थानिक शिवाजी महाविद्यालयात रासेयो विभाग व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. पी. ढोमणे, प्रा. डॉ. विलास खुणे यांच्या नेतृत्वात तंबाखू व्यसनमुक्तीसाठी सामूहिक शपथविधीचा कार्यक्रम घेण्यात आला. तसेच यावेळी लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. चिकटे यांनी व्यसनमुक्तीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. आर. पी. करोडकर, प्रा. रुपेश कोल्हे, प्रा. डॉ. कैलास भांडारकर, प्रा. डॉ. आर. एस. गोरे, प्रा. राऊत, प्रा. आर. के. नंदागवळी, प्रा. डॉ. नक्षिणे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत शनिवार, दि. २२ जून २०१९

# जागतिक योग दिन साजरा



शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली - शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. भुपेश चिकटे यांच्या अध्यक्षतेखाली योग दिन साजरा करण्यात आला. भुपेश चिकटे यांनी योग व प्राणायामचे महत्व सांगितले. याप्रसंगी डॉ. मुधकर नक्षिणे, डॉ. आर. एस. ढोरे, प्रा. दादाजी उईके यांनी कपालभाती, अनुलोम-विलोम बटरफ्लॉय, मंडुकासन, ताडासन, त्रियक ताडासन, त्रिकोणासन, सर्वांगासन, सूक्ष्म व्यायाम, योग प्राणायाम आदींचा सराव कर्मचाऱ्यांकडून करवून घेतला. संचालन डॉ. एम. टी. नक्षिणे तर आभार डॉ. आर. एस. गोरे यांनी मानले.

# वृक्ष लागवड मोहीम उत्साहात

लोकमत सोमवार, दि. ८ जुलै २०१९

शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली

स्थानिक शिवाजी महाविद्यालयाच्या परिसरात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. या मोहिमेचा शुभारंभ प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचा संदेश देऊन वृक्षारोपणाचे महत्व विषद केले. यावेळी प्रा. डॉ. जे. जी. उईके, प्रा. एच. जी. डोमणे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र गोरे, प्रा. डॉ. आर. पी. करोडकर, प्रा. डॉ. विलास खुणे, प्रा. राऊत, प्रा. भांडारकर, प्रा. बायनकर, प्रा. कुतरमारे, प्रा. आर. के. नंदागवळी यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

देशोन्नती
गडचिरोली
शुक्रवार, दि. १२ जुलै २०१९

# शिवाजी महाविद्यालयात सहा विषयांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांना मान्यता

**प्रतिनिधी/ ११ जुलै**

**गडचिरोली:** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित गडचिरोली शहरातील शिवाजी महाविद्यालयात मराठी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास व वाणिज्य या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता मिळाली असून सदर अभ्यासक्रम सुरू करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य चिकटे यांनी दिली.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ जिल्ह्यातील नामांकीत शिक्षण संस्था असून १९७१ रोजी स्थापन झालेल्या आदिवासी भागातील या संस्थेने आदिवासी व ग्रामीण विद्यार्थ्यांकरीता पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. जे गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थी आर्थिक परिस्थीतीमुळे मोठ्या शहरात जावून शिक्षणाची भूक भागवू शकत नाही, अशा विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयाने पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करून शिक्षणाची दारे मोकळी केली आहेत. ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण पुर्ण करून जीवन यशस्वी करावयाचे आहे, अशा विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर शिक्षणाच्या संधीचा लाभ घेऊन त्वरीत प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य चिकटे यांनी केले आहे.

पुण्य नगरी
गुरुवार
२७ जून २०१९

## शिवाजी महाविद्यालय



गडचिरोली : येथील शिवाजी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्यायदिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. बी. एस. चिकटे यांनी आपल्या वक्तव्यातून शाहू महाराजांच्या जीवनकार्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाला प्रा. डॉ. पी. डी. घोरपडे, प्रा. डॉ. आर. एस. गैरे, प्रा. रुपेश कोल्हे, प्रा. एस. पी. ढोमणे, प्रा. राऊत, प्रा. जितेंद्र उईके, प्रा. डॉ. आर. पी. करोडकर, प्रा. विलास खुणे यांच्यासह सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत सोमवार, दि. ८ जुलै २०१९



## शिवाजी कॉलेजमध्ये १६ जणांचे रक्तदान

गडचिरोली : स्थानिक शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने बुधवारी रक्तदान व रक्तगट तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात १६ विद्यार्थ्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. तसेच या शिबिरात ४३ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. एच. चिकटे होते. मार्गदर्शक म्हणून डॉ. किशोर ताराम, सतीश तडकलावार, नरेश कुंदुकुरीवार, सूरज चांदेकर, एम. पेदीवार, कार्यक्रम अधिकारी प्रा. जे. जी. उईके, प्रा. एस. पी. ढोमणे, प्रा. डॉ. आर. पी. करोडकर आदी उपस्थित होते. यावेळी कुनिल नवघरे, प्रवीण चलाख, आशिष रंगारी, अजय कोजामी, सचिन गोटा, अरुण सुद्दीला, राकेश किरमे, रोशन दुधबावरे, सूरज नरोटे, रोहित कुडावले, मनोज पाल, पवन भोयर, हर्षल गेडाम, सुनील सरकार, प्रा. ढोमणे आदींनी रक्तदान केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. चिकटे यांनी रक्तदानाचे महत्त्व पटवून देत आयुष्यात प्रत्येकाने रक्तदान केले पाहिजे, असे सांगितले.

4 April

# विविध उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या विकासाला चालना

देशोन्नती

शुक्रवार, दि. ६ डिसेंबर २०१९



## शिवाजी महाविद्यालय गडचिरोली

**शिवाजी महाविद्यालय गडचिरोली-** महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'जागतिक एड्स दिना निमित्य प्राचार्य डॉ. बि. एल. चिकटे, प्रा. जे. जी. उइके, प्रा. एल. पि. ढोमणे यांच्या नेतृत्वात रॅलीचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थ्यांनी घोषणापत्रे, फलके, नारे, याद्वारे समाजामध्ये जनजागृती केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता प्रा. डॉ. आर. पि. करोडकर,प्रा.नंदागवळी, प्रा.डॉ. विलास खुणे, प्रा.डॉ. विलास खुणे, प्रा.डॉ.राजेंद्र गोरे, प्रा. राऊत, प्रा. भांडारकर यांनी सहकार्य केले.

लोकमत मंगळवार, दि. ३१ डिसेंबर २०१९




## शिवाजी महाविद्यालयात कार्यशाळा

गडचिरोली : स्थानिक शिवाजी महाविद्यालयात रासेयो विभाग व मुक्तिपथ शाखा चातगावच्या संयुक्त विद्यमाने २६ ते २८ डिसेंबरदरम्यान दारू, तंबाखू व्यसनमुक्तीवर कार्यशाळा घेण्यात आली. दरम्यान परिसरातील १४ गावांचे सर्वेक्षण करण्यात आले. प्राचार्य डॉ.बी.एस.चिकटे यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा पार पडली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सुयश तोशाळीवाल, जितेंद्र सहारे, गणेश कोलगिरे, अरुण भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. परिसरातील २४ गावांसाठी २४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. हे २४ स्वयंसेवक गावांमध्ये जाऊन व्यसनाबाबत सर्वेक्षण केले तसेच नागरिकांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य चिकटे यांनी दारू व तंबाखू व्यसनामुळे शरीरावर दुष्परिणाम होतात. त्यामुळे व्यसन सोडावे, असे आवाहन केले. संचालन प्रा.एस.पी.ढोमणे यांनी केले तर आभार प्रा.जे.जी.उईके यांनी मानले.

लोकमत बुधवार, दि. १५ जानेवारी २०२०

# श्रमसंस्कारातून कामाची प्रेरणा

## मान्यवरांचे प्रतिपादन : शिवाजी कॉलेजचे रासेयो शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

गडचिरोली : राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरातून राष्ट्राच्या सर्वांगिण उन्नतीसाठी तरुणांना विधायक कामाची प्रेरणा मिळत असते, असे प्रतिपादन शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव गोविंदराव बानबले यांनी केले.



कार्यक्रमाला उपस्थित प्राचार्य डॉ. भुपेश चिकटे, प्राचार्य मुकुंद म्हशाखेत्री व अन्य

स्थानिक शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयोचे विशेष शिबिर १० ते १६ जानेवारी दरम्यान जेप्रा येथील किसान विद्यालयात पार पडले. यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गुणवंत जंबेवार होते. प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच गुणाजी देशमुख, प्राचार्य मुकुंदा म्हशाखेत्री, पोलीस पाटील धर्मेंद्र गोवर्धन, पोलीस पाटील वामन गडपायले, पं.स.चे माजी सदस्य बापूजी लेनगुरे, विनोद भांडेकर, सुखेदव कोडाप, प्राचार्य डॉ. भुपेश चिकटे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. चिकटे यांनी तरुण ही देशाची शक्ती असून युवकांच्या प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावरच देशाचे भवितव्य अवलंबून आहे. त्यामुळे युवकांनी शिबिराच्या माध्यमातून ग्रामविकासात योगदान द्यावा, असे सांगितले. यावेळी मुकुंद म्हशाखेत्री यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी जे. जी. उईके, संचालन चंचल रोहणकर यांनी केले तर आभार प्रा. एस. पी. ढोमणे यांनी मानले.

पुण्य नगरी मंगळवार, १४ जानेवारी २०२०

# श्रमसंस्कार शिबिरातून विधायक कामाची प्रेरणा : बानबले

पुण्य नगरी / प्रतिनिधी

गडचिरोली : राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरातून राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीसाठी तरुणांना विधायक कामाची प्रेरणा मिळत असल्याने स्वयंसेवकानी या विधायक उर्जाचा वापर समाजासह गावाच्या विकासासाठी करून रचनात्मक कार्य उभे करावे, असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव गोविंदराव बानबले यांनी केले.

शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर १० ते १६ जानेवारी दरम्यान किसान विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय जेप्रा येथे आयोजित केले आहे. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच गुणवंत जंबेवार तर प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच गुणाजी देशमुख, प्राचार्य मुकुंदा पा. म्हशाखेत्री, पोलीस पाटील धर्मेंद्र गोवर्धन, पोलीस पाटील वामन गडपायले, बापूजी लेनगुरे, विनोद भांडेकर, सुखदेव कोडाप, उरकुडे, रडके, विनोद भांडकर, प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे आदी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. चिकटे म्हणाले, तरुण ही देशाची शक्ती असून युवकाच्या प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावरच देशाचे भवितव्य अवलंबून असल्याने युवकांनी अशा शिबिराच्या माध्यमातून ग्रामविकासात जास्तीत जास्त सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. तसेच महात्मा गांधीजींच्या सामाजिक विचारांमधून प्रेरणा घेऊन त्यांच्या शांततेच्या मार्गाचा अवलंब करून विद्यार्थ्यांनी स्वतःची उन्नती करावी असे सांगितले.

प्राचार्य मुकुंदा म्हशाखेत्री म्हणाले, शिबिराच्या माध्यमातून खेड्यातल्या जनतेचे श्रम जवळून पाहता येतात. विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणांचा विकास होऊन आयुष्यातील महत्त्वपूर्ण यशाकडे वाटचाल करतात. तारुण्यात प्रचंड ताकद असल्याने तरुणांनी आपली उर्जा चांगल्या कामासाठी वापरावी.

प्रास्ताविक जे.जी. उईके यांनी केले. संचालन चंचल रोहणकर तर आभार प्रा. एस.पी. ढोमणे यांनी मानले. कार्यक्रमाल प्रा.डॉ. एम.जे. मेश्राम, प्रा.डॉ. विलास खुणे, प्रा.डॉ. कैलास भांडारकर, प्रा. डॉ. राजेंद्र गोरे, प्रा. आर. के. नंदागवळी, संजय राऊत आदी उपस्थित होते.

**दैनिक भास्कर**

नागपुर, सोमवार, 20 जनवरी 2020

# रासेयो शिविर से युवाओं का विकासः चापले

ब्यूरो| गड़चिरोली.

राष्ट्रीय सेवा योजना के माध्यम से होनेवाले विभिन्न श्रमसंस्कार शिविर से युवाओं का विकास होता है, ऐसे कथन शिवाजी शिक्षण प्रसारक मंडल के सदस्य डी. एन. चापले ने कहे। शिवाजी महाविद्यालय की ओर से आयोजित राष्ट्रीय सेवा योजना के समापन कार्यक्रम में वे बोल रहे थे। इस समय परशुराम म्हशाखेत्री, शहर ब्राम्हणवाड़े, भगवान मुनघाटे, पंस सदस्य नेताजी गावतुरे, प्राचार्य मुकुंदा म्हशाखेत्री, डब्लु. एल. चौधरी, खोब्रागड़े, मेश्राम, प्रा. डा. जे. जी. उईके, उपसरपंच गुणाजी देशमुख आदि मान्यवर उपस्थित थे।

अपने मार्गदर्शन में प्राचार्य डा. चिकटे ने कहा कि रासेयो शिविर से स्वयंविकास होता है वहीं सकारात्मक विचार निर्माण होते हैं। महापुरुषों का आदर्श अपने सामने रख विद्यार्थी समाज विकास के लिये कार्य करें। ऐसी बात उन्होंने कही। शिविर के दौरान जलसाक्षरता स्वच्छ व स्वस्थ्य भारत अभियान चलाया गया।

वहीं गांव के समीपस्थ कठानी नदी पर बांध का निर्माण, स्वयंसेवकों ने गांव में सर्वेक्षण समेत स्वच्छता, पौधारोपण आदि उपक्रम भी चलाए।

इसके अलावा स्वयंसेवकों ने नशामुक्ति पर पथनाट्य पेश किया। कार्यक्रम में प्रा. डा. एम. जे. मेश्राम, प्रा. डा. विलास खुणे, प्रा. डा. एम. टी. नक्षिणे, प्रा. संजय राऊत आदि मान्यवर उपस्थित थे।

**लोकमत** सोमवार, दि. २० जानेवारी २०२०

# रासेयोच्या शिबिराचा समारोप

## जेप्रा येथे कार्यक्रम : शिवाजी कॉलेजतर्फे विविध उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

गडचिरोली : स्थानिक शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर जेप्रा (राजगाटा माल) येथे पार पडले. या शिबिराचा समारोप शनिवारी करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिवाजी शिक्षण संस्थेचे सदस्य डी. एन. चापले, परशुराम म्हशाखेत्री, सदस्य शरद ब्राम्हणवाडे, भगवान मुनघाटे, पं. स. सदस्य नेताजी गावतुरे, प्राचार्य मुकुंदा म्हशाखेत्री, डब्ल्यू. एल. चौधरी, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे. जी. उईके, उपसरपंच गुणाजी देशमुख व मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाला उपस्थित प्राचार्य मुकुंद म्हशाखेत्री व अन्य मान्यवर.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरातून युवकांचा व समाजाचा विकास होतो, असे डी. एन. चापले यांनी सांगितले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे यांनी लोकांमध्ये गेल्याशिवाय तसेच समाजामध्ये वावरल्याशिवाय शहाणपण येत नाही, असे सांगितले. संचालन चंचल रोहणकर हिने तर आभार तेजस्विनी बारसागडे हिने मानले.

पुण्य नगरी
रविवार, १९ जानेवारी २०२०

# रासेयोच्या शिबिरातून युवकांचा विकास : चापले

गडचिरोली : राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या विविध श्रमसंस्कार शिबिरातून युवकांचा व समाजाचा विकास होतो, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य डी.एन. चापले यांनी केले.

शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने जेप्रा येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी परशुराम पाटील म्हशाखेत्री, शरद ब्राम्हणवाडे, भगवान मुनघाटे, पं.स. सदस्य नेताजी गावतुरे, प्राचार्य मुकुंदा म्हशाखेत्री, डब्ल्यू.एल. चौधरी, खोब्रागडे, मेश्राम, प्रा.डॉ. जे.जी. उईके, उपसरपंच गुणाजी देशमुख




आदी उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. चिकटे म्हणाले, लोकांमध्ये गेल्याशिवाय समाजामध्ये वावरल्याशिवाय शहाणपण येत नाही. विद्यार्थ्यांनी आईवडिलांवरील अवलंबित सोडून स्वयंपूर्ण व्हायला हवे. रासेयो शिबिरामुळे स्वयंविकास होतो व सकारात्मक विचाराने माणुस पुढे जातो. विद्यार्थ्यांनी थोरमोठ्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा. माणसे समजायला एकत्र यावे लागते. तसेच विद्यापीठ व कॉलेज हे अमृताचे कुंभ आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. एनएसएसच्या माध्यमातून व्यक्तीमत्त्व विकास व आत्मविश्वास वाढतो.

यावेळी कुणाल नक्षिणे, सूरज मोहुर्ले, चेतन कोलते, भाग्यश्री खोब्रागडे, तेजस्विनी वाढई यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. एस.पी. ढोमणे यांनी केले. शिबिरात विद्यार्थ्यांनी जलसाक्षरता स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान राबविले. तसेच गावालगत असलेल्या कठाणी नदीवर बंधारा बांधला, स्वयंसेवकांनी गाव सर्वेक्षणासह स्वच्छता, वृक्षारोपण असे उपक्रम राबविले. तसेच स्वयंसेवकांनी व्यसनमुक्तीवर पथनाट्य सादर केले. यावेळी प्रा. डॉ. एम.जे. मेश्राम, प्रा.डॉ. विलास खुणे, प्रा.डॉ. एम.टी. नक्षिणे, प्रा. संजय राऊत आदी उपस्थित होते. संचालन चंचल रोहणकर तर आभार तेजस्विनी बारसागडे हिने मानले.

देशोन्नती
गडचिरोली
रविवार दि. १९ जानेवारी २०२०

शिबीर | शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य डि.एन. चापले यांचे प्रतिपादन

# रासेयोच्या शिबीरातून युवकांचा विकास



## समाजात वावरल्याशिवाय शहाणपण येत नाही-प्राचार्य डॉ. चिकटे

मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. भूपेश एस. चिकटे म्हणाले की, लोकांमध्ये गेल्याशिवाय, समाजामध्ये वावरल्याशिवाय शहाणपण येत नाही. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांवर अवलंबित्व सोडून स्वयंपूर्ण व्हायला हवे. राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामुळे स्वयंविकास होतो व सकारात्मक विचाराने माणूस पूढे जातो. विद्यार्थ्यांनी थोरमोठ्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा. माणसे समजायला एकत्र यावे लागते. तसेच विद्यापीठ आणि कॉलेज हे अमृताचे कुंभ आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. एन.एस.एस. च्या माध्यमातून व्यक्तीमत्व विकास आणि आत्मविश्वास वाढतो असेही ते म्हणाले.

**गडचिरोली ▫ प्रतिनिधी**

राष्ट्रिय सेवा योजनेच्या माध्यमातुन घेतल्या जाणार विविध श्रमसंस्कार शिबीरातुन युवकांचा व समाजाचा विकास होतो असे प्रतिस्पादन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य डि.एन.चापले यानी केले.

गडचिरोली येथील शिवाजी महाविद्यालयाच्यावतीने जेप्रा येथे आयोजीत राष्ट्रिय सेवा योजनेच्या समारोपीय कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन उपाध्यक्ष परशुराम पाटील म्हशाखेत्री, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य शरदराव पाटील ब्राम्हणवाडे , सदस्य भगवान पाटील मुनघाटे, पंचायत समिती सदस्य नेताजी गावतूरे, प्राचार्य डॉ. चिकटे, किसान विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मुकूंदा पाटील म्हशाखेत्री, डब्लू.एल. चौधरी, प्रतिष्ठित नागरिक, खोब्रागडे, मेश्राम, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.जे.जी. उईके, उपसरपंच गुणाजी देशमूख आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.पी. ढोमणे, चंचल रोहणकर यानी कार्यक्रमाचे संचालन केले व आभार तेजस्वीनी बारसागडे हिने मानले.

जेप्रा गावात झालेल्या शिबीरात विद्यार्थ्यांनी जलसाक्षरता, स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान राबविले.तसेच गावालगात असलेल्या कठाणी नदीवर बंधारा बांधला.

याशिवाय स्वयंसेवकांनी गावसर्वेक्षणासह स्वच्छता ,वृक्षारोपण असे उपक्रम राबविले.व्यसनमुक्तीवर पथनाट्य सादर केले. याप्रसंगी प्रा.डॉ.एम.जे. मेश्राम, प्रा.डॉ. विलास खुणे, प्रा. डॉ.एम. टी. नक्षिने, प्रा. संजय राऊत, शिक्षकेतार कर्मचारी उपस्थित होते.

6 Dec.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

देशोन्नती
शनिवार, दि. ७ डिसेंबर २०१९



शिवाजी महाविद्यालय गडचिरोली

**शिवाजी महाविद्यालय गडचिरोली-** गडचिरोली येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६४ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्य महाविद्यालयातर्फे व राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. भुपेश चिकटे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पी.डी. घोरपडे, रा.से.यो कार्यक्रम प्रमुख जे.जी. उईके, एस.पी. ढोमणे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता डॉ. एम.जे. मेश्राम, आर.के. नंदागवळी, डॉ. के.आर. भांडारकर, ग्रंथपाल एस.पी. राऊत अधिक्षक संतोषवार यांनी सहकार्य केले.

लोकमत शनिवार, दि. ७ डिसेंबर २०१९

**शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली -** येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भूपेश चिकटे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पी. डी. घोरपडे, रासेयो कार्यक्रम प्रमुख जे. जी. उईके, एस. पी. डुमणे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्यावर विचार व्यक्त केले. यशस्वीतेसाठी डॉ. एम. जे. मेश्राम, आर. के. नंदागवळी, डॉ. के. आर. भांडारकर, ग्रंथपाल एस. सी. राऊत, अधीक्षक गजानन संतोषवार यांनी सहकार्य केले.

**पुण्यनगरी** शनिवार, ४ जानेवारी २०२०

# सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

गडचिरोली : शिवाजी महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एस. चिकटे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. आर.एस. गोरे, डॉ.जे.जी. उईके, प्रा.आर.एस. कोल्हे, प्रा. डॉ. एम.टी. नक्षिणे, प्रा.एस.पी. ढोमने, प्रा. ताजणे, प्रा. वसाके उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. संचालन चंचल रोहणकर तर आभार लक्ष्मी मुळे हिने मानले.

गडचिरोली

**लोकमत** सोमवार, दि. ६ जानेवारी २०२०

**शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली** - येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.भूपेश चिकटे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ.आर.एस.गोरे, डॉ.जे.जी.उईके, प्रा.आर.एस.कोल्हे, डॉ. एम. टी. नक्षिणे, प्रा.एस. पी. ढोमणे, प्रा.नीता ताजने, गीता वसाके उपस्थित होते. याप्रसंगी भारत मेश्राम, सूरज मोहुर्ले, मिथुन फदींया यांनी मनोगत व्यक्त केले. संचालन चंचल रोहणकर तर आभार लक्ष्मी मुळे हिने मानले.